रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १९१
www.ramprahar.com

रविवार, २८ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मराठीच्या प्रसारासाठी सामूहिक प्रयत्न करूया : राज्यपाल/२

पनवेल परिसरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा/६

शिरवलीवाडी संघ आदिवासी चषकाचा मानकरी/८

## रोहन बोपन्नाने ग्रँड स्लॅम जिंकून रचला इतिहास



**सिडनी** : भारताचा टेनिसपटू रोहन बोपन्ना आणि त्याचा सहकारी मॅथ्यूज एब्डनने ऑस्ट्रेलियन ओपनच्या पुरूष दुहेरीचे विजेतेपद पटकावले आहे. त्यांनी इटालियन जोडी सिमोने आणि अँड्रियाचा ७-६ (७-०), ७-५ असा पराभव केला. बोपन्नाने वयाच्या ४३व्या वर्षी पहिले ग्रँडस्लॅम जिंकून इतिहास रचला आहे. यापूर्वी तो युएस ओपनमध्ये दोनवेळा अंतिम फेरीत पोहचला होता, मात्र त्याला विजेतेपदाने हुलकावणी दिली होती. अखेर त्याने ही कसर भरून काढली. याआधी त्याने २०१७मध्ये डॅब्रियला डाब्रोवस्कीच्या साथीने फ्रेंच ओपन मिश्रित दुहेरी ग्रँड स्लॅम जिंकले होते. बोपन्ना ग्रँड स्लॅम जिंकणारा सर्वांत वयस्कर खेळाडू ठरलाय. सोबतच तो चॅम्पियन बनणारा वयस्कर खेळाडू आहे. त्याने जीन ज्युलियन रोजरचा विक्रम मोडित काढला.

# मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य

## राज्य सरकारकडून सुधारित अध्यादेश जारी



**नवी मुंबई : बातमीदार**

आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या मराठा समाजाच्या लढ्याला यश मिळाले आहे. या संदर्भात शनिवारी (दि.२७) मध्यरात्री तब्बल तीन तास झालेल्या चर्चेनंतर राज्य सरकारने सुधारित अध्यादेश जारी करून सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. स्वतः जरांगे-पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे-पाटील हे समाज बांधवांसोबत जालन्यातील आंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले होते. मजल दरमजल करीत हा जथ्था प्रजासत्ताक दिनी नवी मुंबईतील वाशी येथे पोहचला. तेथे भव्य जाहीर सभा झाली. दरम्यान, सरकार सातत्याने जरांगे-पाटील यांच्या संपर्कात होते. सरकारी शिष्टमंडळाने मध्यरात्री अंतिम चर्चा करीत सुधारित अध्यादेश जारी केला, ज्यानुसार मराठा समाजाच्या सर्व मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.

> **हा मराठा समाजाचा विजय आहे. समाजाच्या सर्व मागण्या मान्य झाल्या, अध्यादेश निघाला. त्यामुळे आम्ही आता आंदोलन स्थगित करतोय. सध्या राज्यभर दिवाळी सुरू आहे. यापेक्षा वेगळा आनंद काय असणार?**
> **-मनोज जरांगे-पाटील, मराठा समाजाचे नेते**

मराठा समाजाच्या ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. या नोंदींचे प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे तसेच त्यांच्या कुटुंबियांना ताबडतोब प्रमाणपत्र देण्यात यावेत यासाठी आपला लढा होता. ही प्रक्रिया सुरू झाली आहे. याबाबतचा डाटा सरकार थोड्याच दिवसांत देणार आहेत, असे जरांगे-पाटील यांनी सांगितले.

ज्याची नोंद सापडली त्याच्या सगेसोयऱ्यांनाही प्रमाणपत्र देण्याकरिता अध्यादेश पारित करण्यात आला आहे. मराठा समाजाच्या मूळ मागण्या पूर्ण झाल्या आहेत. यावर तीन तास चर्चा झाली. मुंबई हायकोर्टाच्या वरिष्ठ वकिलांनी शब्दन् शब्द वाचून खात्री केली आहे, त्यानंतरच बाहेर पडलो, असे जरांगे-पाटील म्हणाले.

दोन वेगवेगळ्या बैठका होत्या. मंत्रिमहोदय आणि सचिवांची एक बैठक झाली, तर आमच्या वकिलांची वेगळी बैठक झाली. राज्यभर मराठा आंदोलकांवर लावलेले गुन्हे मागे घेण्याचे पत्र गृहमंत्र्यांनी दिले आहे, अशी माहिती जरांगे-पाटीलांनी दिली.

मराठवाडा व काही ठिकाणी नोंदी कमी सापडल्या आहेत. त्यामुळे या नोंदी शोधण्याकरिता शिंदे समितीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यांनी ही मागणीही मान्य केली आहे. वंशावळ जोडण्यासाठी तालुकास्तरावर समिती स्थापन केली आहे. त्याचाही शासननिर्णय झाला आहे, असे जरांगे-पाटील यांनी म्हटले.

समाजाचे मोठे काम झाले आहे. आता आपला लढा संपला आहे. त्यामुळे समाज म्हणून आपला विरोध व विषय संपला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## मनोज जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सोडले उपोषण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे-पाटील यांची शनिवारी सकाळी नवी मुंबईतील वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भेट घेऊन त्यांचे उपोषण सोडवले आणि त्यांना सकल मराठा समाजासमोर राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेची प्रत दिली तसेच त्यांच्या कपाळाला गुलाल लावत त्यांचे अभिनंदन केले. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय शिवराय आदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण देण्यासाठी जाहीरपणे घेतलेली छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ पूर्ण करीत असल्याची ग्वाही देतानाच सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी घेतलेले निर्णय हे मतासाठी नाही, तर सर्व घटकांच्या हितासाठी घेतल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी सांगितले.

आपल्या मागण्यांसाठी मुंबईच्या वेशीपर्यंत आलेल्या मराठा समाज बांधवांना भेटण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे सकाळी सव्वानऊच्या सुमारास वाशी येथे आले. त्यानंतर ते पायी चालत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गेले. त्या ठिकाणी त्यांनी मनोज जरांगे-पाटील यांच्यासमवेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आणि जरांगे-पाटील व्यासपीठावर आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेची प्रत जरांगे यांना देण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या हाताने मोसंबीचा रस घेऊन जरांगेंनी आपण उपोषण सोडल्याचे जाहीर केले. मराठा समाज बांधवांची मागणी पूर्ण केल्याबद्दल जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांचा या वेळी सत्कार केला.



### आनंदोत्सव साजरा

मराठा आरक्षणासंदर्भात मागण्या मान्य झाल्यानंतर राज्यभरात मराठा बांधवांनी एकच जल्लोष केला. मराठा आरक्षण आंदोलनाचा विजय झाल्यावर नवी मुंबईतील वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि मुख्यमंत्री शिंदे यांची भव्य सभा पार पडली. या वेळी उपस्थित मराठा समाज बांधवांनी नाचून, गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. यानंतर मराठा समाजाकडून संपूर्ण राज्यभरात जल्लोष केला जात आहे.

> **सकल मराठा समाजासाठी आंदोलन करणाऱ्या जरांगे-पाटील यांच्या संघर्षाचा हा विजय आहे. कोणतेही गालबोट न लागू देता अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे आंदोलन यशस्वी केल्याबद्दल मराठा समाजाचे कौतुक आणि अभिनंदन!**
> **-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

सकल मराठा समाज बांधवांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मी आपल्या प्रेमोपोटी या ठिकाणी आलो आहे. दिलेला शब्द पाळणे ही माझी कार्यपद्धती आहे. मीदेखील सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा असल्याने गरीब मराठा समाजाच्या दुःखाची जाणीव मला आहे. मराठा समाजासाठी लढणारे कै. अण्णासाहेब पाटील यांच्या कर्मभूमीत हा कार्यक्रम होत आहे, त्यांनाही मी अभिवादन करतो. आमच्या सरकारने सर्वसामान्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी घेतलेले निर्णय हे मतासाठी नव्हे, तर सर्व समाज घटकांच्या हितासाठी घेतले आहेत.

जरांगे-पाटील यांनी केलेल्या मागण्या राज्य शासनाने मान्य केल्या असून कुणबी नोंदी शोधताना सगेसोयऱ्यांचादेखील त्यात समावेश केला आहे. यासोबतच शिंदे समितीला मुदतवाढ द्यायला मान्यता दिली. मराठा आंदोलनात जे बांधव मृत्युमुखी पडले त्यांनादेखील नुकसानभरपाई देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अन्य समाज घटकांवर अन्याय न करता मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगून मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली.

मनोगत व्यक्त करण्यापूर्वी जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना पेढा भरवून त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजासाठी सकारात्मक पद्धतीने निर्णय घेऊन अधिसूचना काढली, त्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

या वेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार संजय शिरसाट, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त मधुकर अर्दड, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर आदी उपस्थित होते.

## निवडक

### खंडणीसाठी वकील दाम्पत्याचे अपहरण करून निर्घृण हत्या

**नगर** : राहुरी न्यायालयात वकिली करणाऱ्या पती-पत्नीचा कट रचून अपहरण करून पाच लाखांच्या खंडणीसाठी त्यांचा निर्घृण खून करण्यात आला. राजाराम जयवंत आढाव (वय ५२) आणि मनीषा राजाराम आढाव (वय ४२, दोघेही रा. मानोरी) अशी मृतांची नावे आहेत. या प्रकरणी एका सराईत गुन्हेगारासह चार जणांना पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली आहे.

### दुबईहून सोन्याची तस्करी; साडेतीन कोटींचे सोने जप्त

**पुणे** : दुबईवरून तस्करी करून आणलेले सहा किलो ९१२ ग्रॅम सोने महसूल गुप्तचर संचलनालयाने (डीआरआय) पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर जप्त केले. सोन्याची तस्करी करणाऱ्या महिलेसह दोघांना पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते डायलेसिस सेंटरचे उद्घाटन



**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचा सामाजिक उपक्रम असलेल्या कमळ सेवा संस्था संचालित श्री. सतिश वासुदेव धारप डायलेसिस सेंटरचे शनिवारी (दि. २७) राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अलिबागमधील श्रीबाग नं. २ येथे हे डायलेसिस सेंटर सुरू झाले आहे. उद्घाटन समारंभास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सेवा विभाग कोकण प्रांत प्रमुख विवेक भागवत, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार जयंत पाटील, भाजपचे रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतिश धारप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक रघुजी आंग्रे, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशिल पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, दिलीप भोईर, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष हेमा मानकर आदी उपस्थित होते.

या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, सेवा हा संघाच्या विचारांचा मूळ गाभा आहे. त्यामुळे आपली संख्यात्मक कितीही वाढ झाली तरी विचारांचा आदर्श ठेवून सेवाकार्य सुरू ठेवले पाहिजे. कमळ नागरी सहकारी पतसंस्था संघाच्या विचाराने काम करीत आहे. आर्थिक क्षेत्रात काम करीत असताना सेवाकार्यदेखील करीत आहे. **(पान २ वर..)**

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनानुसार देशसेवा करूया -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या त्यागातून आणि समर्पणातून हे राष्ट्र घडवायचे आहे. त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केल्याप्रमाणे देशासाठी जे देता येईल त्यासाठी प्रयत्न करायचा आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी हुत्मात्मा स्मारक मैदानात ध्वजारोहणावेळी केले.



देशाचा ७५वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा झाला साजरा झाला. यानिमित्ताने पनवेल शहरातील हुतात्मा स्मारक मैदानात हुतात्म्यांचे वंशज नारायण किसनराव जगनाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, प्रांत अधिकारी राहुल मुंडके आणि आयुक्त गणेश देशमुख यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

ध्वजारोहण समारंभाला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार, कैलास गावडे, गणेश शेट्टी, वैभव विधाते, ज्योतिका गावडे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.



**उलवे नोड : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सुजग सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत विजेत्यांचा बक्षीस देऊन गुणगौरव केला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत आदी उपस्थित होते. (वृत्त पान ३ वर..)**

## नमो चषक गीत गायन स्पर्धेला प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला व सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात होत आहे. त्या अंतर्गत आयोजित नमो चषक गीत गायन स्पर्धेचा प्रारंभ शनिवारी (दि. २७) खारघर येथे झाला.



देशाचे कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने जगात मोठी झेप घेतली. त्याबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होत आहेत. **(पान २ वर..)**

## समाजातील शेवटच्या माणसाचा उद्धार करणे हेच उद्दिष्ट

### आमदार महेश बालदी यांचे प्रतिपादन; विकासकामांचे लोकार्पण

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

समाजातील शेवटच्या माणसाचा उद्धार करण हेच आमदाराचे उद्दिष्ट असले पाहिजे हे मानणारा मी कार्यकर्ता आहे. त्यामुळे तुमच्या सर्वांचा विकास करणे ही माजी जबाबदारी असून आपण सर्वांनी प्रवाहासोबत वेगाने बदलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी सवणे येथे विकासकामांच्या लोकार्पणावेळी केले.

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या ६४ लाख रुपयांच्या स्थानिक विकास निधीतून सवणे येथे रस्ते, समाजमंदिर आणि साकव बांधण्यात आला असून या कामांचे लोकार्पण आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्याचप्रमाणे दाखल्यांचेही वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून ठाकरे गटाचे शाखाप्रमुख नितेश कारंदे यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.



या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सर्व समाजाचा विचार करणारे नेतृत्व आपल्याला लाभले आहे, अशा शब्दांत आमदार महेश बालदी यांच्या कामाचे कौतुक केले.

या वेळी ठाकरे गटाचे शाखाप्रमुख नितेश कारंदे यांच्यासह कल्पेश कदम, सचिन मालुसरे, हेमंत भोईर, रकेश कदम, साहिल दाभणे, अनिकेत शिर्के, रोहित कारंदे, अभिजीत कारंदे, सुमित कारंदे, योगेश क्रीजक्कर, करण तुंगारे, शुभम दाभणे, प्रकाश वाघमारे, देवेश देवळेकर, राजेश बोराने, सुजल तुंगारे, सार्थक दाभणे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे उपस्थित मान्यवरांनी पक्षात स्वागत केले. **(पान २ वर..)**

# मराठीच्या प्रसारासाठी सामूहिक प्रयत्न करूया

## राज्यपाल रमेश बैस यांचे आवाहन; विश्व मराठी संमेलनाचे उद्घाटन

**ठाणे : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्याच्या या अमृत काळात आपण सर्वांनी मिळून आपल्या अमृतवाणी मराठीचा जगभरात प्रसार करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करूया, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी शनिवारी (दि. २७) नवी मुंबई येथे केले. विश्व मराठी संमेलन २०२४चा उद्घाटन सोहळा नवी मुंबईतील सिडको प्रदर्शन केंद्र या ठिकाणी झाला. त्या वेळी ते बोलत होते.



उद्घाटन समारंभास भाषा व शालेय शिक्षण तथा मुंबई (शहर) पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मंदा म्हात्रे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे, माध्यम सल्लागार जयू भाटकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव हर्षवर्धन जाधव, राज्य मराठी भाषा कोष मंडळाचे सचिव डॉ.शामकांत देवरे, साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या मनोगताच्या सुरुवातीलाच मराठी समजत असली तरी मला मराठी अस्खलितपणे बोलता येत नाही याची मला खंत आहे, अशा शब्दात राज्यपाल बैस यांनी दिलगिरी व्यक्त करून महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरांशी संबंधित विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी पुढील तीन दिवसांत संगीत, साहित्य, मनोरंजन, पुस्तक वाचन सत्र आणि भरपूर चर्चा असे विविध कार्यक्रम होणार आहेत याबद्दल राज्यपालांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची आवर्जून आठवण काढून ते म्हणाले, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, चक्रधर स्वामी, संत तुकाराम, संत रामदास आणि महाराष्ट्रातील अनेक संतांचे केवळ महाराष्ट्रातील जनतेनेच नव्हे; तर संपूर्ण मानवजातीने कृतज्ञ असले पाहिजे, ज्यांनी आपल्याला चांगले जीवन जगण्याचा मार्ग दाखविला.

मराठी भाषामंत्री दीपक केसरकर म्हणाले की, परदेशात आपल्या महाराष्ट्राची प्रतिमा चांगली आहे. परदेशात असूनही कित्येकांनी मराठी भाषा जपली ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. आपल्या राज्यातही लवकरच मराठी भाषा भवनाची निर्मिती होणार आहे. यासाठी शासनाने २६० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केलेली आहे. मराठी भाषा भावनाच्या निर्मितीनंतर मराठी भाषा संवर्धनाशी संबंधित असलेली सर्व कार्यालये, मंडळे ही एकाच इमारतीत येणार आहेत. त्यामुळे मराठी भाषा संवर्धनाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता व गती येईल.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रस्तावना करताना मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव यांनी मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून मराठी भाषा संवर्धनासाठी होत असलेली विविध कामे,उपक्रम तसेच या विश्व मराठी संमेलनात आयोजित विविध कार्यक्रम व उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका मृण्मयी भजक यांनी केले, तर आभार डॉ.शामकांत देवरे यांनी मानले.

### मराठी भाषा सर्वांना एकत्रित ठेवणारा समान धागा : मुख्यमंत्री

**मराठी भाषा ही आपली संस्कृती, परंपरा आणि इतिहास आहे. मराठी माणसाची धडाडी, संघर्ष सर्वांना ठाऊक आहे. त्यातूनच मराठी माणूस मोठा होतो. या मराठी विश्व संमेलनच्या माध्यमातून जगभरातील मराठी माणसांना एकत्रित येता आले आहे. म्हणूनच मराठी भाषा सर्वांना एकत्रित ठेवणारा समान धागा आहे, असे उद्गार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषा विभागाचे मनःपूर्वक अभिनंदन केले व ते म्हणाले, मराठी भाषा आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून मराठी भाषेचे महत्व अधोरेखित केले होते. विविध परिसंवाद, नाट्य संमेलन, साहित्य संमेलन अशा विविध माध्यमांतून माय मराठीचा गजर सुरू आहे. मराठी भाषेचे महत्व वाढविण्यासाठी याचप्रकारे आयोजित करण्यात आलेला मराठी भाषा पंधरवडाही अत्यंत यशस्वीपणे झाला. मराठी भाषेचा वापर वाढत आहे.**

# सरकारने अतिशय चांगला तोडगा काढला

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मराठा समाज आरक्षणावर प्रतिक्रिया

**नागपूर : प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी अतिशय चांगला मार्ग निघून या आंदोलनाची सांगता झाली आहे. सरकारने या आरक्षणासाठी सकारात्मकता दाखवली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात हा प्रश्न सुटलेला आहे.

आम्ही सुरुवातीपासून जो काही मार्ग असेल तो कायदेशीर, संविधानाच्या चौकटीत काढावा लागेल असे सांगत होतो. ज्यांच्या नोंदी सापडल्यात त्यांच्या रक्तांच्या नातेवाईकांना प्रमाणपत्र देता येईल. आज जो मार्ग निघाला तो सरकारने आणि मनोज जरांगे-पाटील यांनीही स्वीकारला. यातून मराठा समाजाचा प्रश्न सुटणार आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ज्या लोकांकडे कुठल्याच नोंदी नाहीत त्यांचाही प्रश्न आपल्याला सोडवावा लागेल. हा एक मोठा समाज आहे. त्यासाठी जे सर्वेक्षण हवे ते सुरू आहे. क्युरेटिव्ह पिटीशन यशस्वी व्हावे यासाठी आमचा प्रयत्न आहे, पण काही कारणात्सव त्या अपेक्षित दिलासा मिळाला नाही, मात्र सुप्रिम कोर्टाने आरक्षण रद्द करताना ज्या काही त्रुटी काढल्या होत्या त्या त्रुटी भरून काढण्यासाठी या सर्वेक्षणाचा वापर होणार आहे. त्यासोबत ओबीसी समाजाच्या मनात आपल्यावर अन्याय होईल का अशी भावना होती, मात्र तोदेखील अन्याय आपण होऊ दिला नाही.



कुठल्याही प्रकारे ओबीसीवर अन्याय होईल असा निर्णय राज्य सरकारने घेतला नाही. नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येत होत्या त्या सोडवण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला आहे. ज्यांच्याकडे नोंदी आणि पुरावा नाही अशांना प्रमाणपत्र दिली जात नाहीत. नोंदी मिळण्याची कार्यपद्धती सोपी करून हा मार्ग काढला आहे. त्यामुळे छगन भुजबळांचेही समाधान होईल. ओबीसी समाजावर अन्याय होऊ द्यायचा नाही ही आमची पहिल्यापासून भूमिका होती. त्याप्रकारे आम्ही अन्याय होऊ दिला नाही, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## पान १ वरुन

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते डायलेसिस सेंटरचे उद्घाटन

श्री. सतिश धारप डायलेसिस सेंटरमध्ये केवळ तांत्रिकता असता कामा नये. येथे उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना सेवाभाव दिसला पाहिजे. आरोग्य सेवेच्या माध्यमातून मनुष्यसेवा करण्याची संधी या केंद्राच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे या केंद्राचे व्यावसायिक केंद्र होणार नाही याची खबरदारी घ्यावी तसेच उपचार देत असताना किडनीचे आजार होऊ नये यासाठी जनजागृती करावी, असे विवेक भागवत म्हणाले.

कमळ पतसंस्थेचा विकास होत आहे. त्यात आम्हाला सोबती व्हायला मिळाले याचा आम्हाला आनंद आहे. ही संस्था सहकाराबरोबरच सामाजिक कार्यदेखील करत आहे. या सेवा घेणाऱ्यांचे आशीर्वाद त्यांना मिळणार आहेत. या संस्थेचा आदर्श इतर संस्थांनी घेतला पाहिजे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. रामशेठ ठाकूर परिवारातर्फे श्री. ससिश धारप डायलेसिस सेंटरला ११ लाख रुपये देणगी दिली जाईल, असेही त्यांनी या वेळी जाहीर केले.

आपल्याकडे कितीही मोठ्या यंत्रणा असल्या, साधने असली तरी त्याचा उपयोग नाही. त्याचा वापर मानवसेवेसाठी करण्याची इच्छाशक्ती असावी लागते, तरच चांगली कामे करता येतात. हे डायलेसिस सेंटर अलिबागमध्ये सुरू झाले आहे तसे हृदयविकारावर उपचार करणारे केंद्र रागयड जिल्ह्यात सुरू व्हायला पाहिजे, अशी इच्छा सतीश धारप यांनी व्यक्त केली.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी प्रास्ताविक केले. पतसंस्थेचे अध्यक्ष सतीशचंद्र पाटील यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले, तर कमळ सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश प्रधान यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

### नमो चषक गीत गायन स्पर्धेला प्रारंभ

या अनुषंगाने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला. त्यातील एक भाग असलेली गीत गायन स्पर्धा वय १६ ते २५ आणि २५ ते पुढे अशा दोन गटांत होत आहे.

पनवेल ग्रामीण व खारघर शहरच्या ऑडिशनला शनिवारी खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे सुरुवात झाली. या वेळी आयोजक रवींद्र नाईक, युवा मोर्चाचे खारघर अध्यक्ष नितेश पाटील, पार्श्वगायक व परीक्षक गणेश भगत, शास्त्रीय संगीत शिक्षिका परीक्षक वर्षा लोकरे, चंद्रकांत मंजुळे, आदित्य हाणगे, अक्षय लोखंडे, दिनेश यादव आदी उपस्थित होते.

गीत गायन स्पर्धेतील पनवेल शहर, कळंबोली शहर आणि कामोठे शहराची ऑडिशन रविवारी (दि. २८) खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात होईल, तर अंतिम फेरी सोमवारी (दि.२९) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

### समाजातील शेवटच्या माणसाचा उद्धार करणे हेच उद्दिष्ट

मोदीमाळ वाडी येथे झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, गुळसुंदे विभागीय जि.प. अध्यक्ष अविनाश गाताडे, माजी सरपंच किरण माळी, भगवान देशमुख, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, जांभिवलीच्या सरपंच रिया कोंडिलकर, कराडे खुर्दच्या सरपंच भारती चितळे, उपसरपंच मिलन ठोंबरे, माजी सरपंच रवी चितळे, विजय मुरकुटे, माजी उपसरपंच यशश्री मुरकुटे, शांताराम देशमुख, रत्नाकर घरत, सुभाष देशमुख, परशुराम वाघ, राघव वाघ, प्रतिक भोईर, योगेश पाटील, योगेश मुरकुटे, प्रमिला पाटील, कृष्णा कोंडीलकर, राजा पवार, प्रदीप देशमुख, धनाजी देशमुख, विठ्ठल देशमुख, सुरेश देशमुख, विनायक देशमुख, जनार्दन महाडीक, बंडू मोकल यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# आगामी निवडणुकांसाठी जोमाने कामाला लागा -दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

भाजपच्या १९४ महाड विधानसभा मतदारसंघात सुपर वॉरियर माध्यमातून विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या महाडमधील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आगामी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले.



या वेळी सुपर वॉरियर्सच्या पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना विधान परिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर म्हणाले की, केंद्रात आपले सरकार आहे राज्यात मुख्यमंत्री आपला नसला तरी सरकार आपले आहे, असा विश्वास त्यांनी या वेळी जमलेल्या कार्यकर्त्यांना देऊन तुम्ही विकासाची चिंता करू नका भविष्यात वॉरियरची संख्या वाढून पक्षाची बांधणी योग्य रीतीने होईल असा विश्वास प्रवीण दरेकर यांनी कार्यकर्त्यांना दिला.

महाड विधानसभा मतदारसंघात आमदार जरी आपला नसला तरी महाड पोलादपूर मधील प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम विधिमंडळाच्या माध्यमातून मी केले आहे, महाड पोलादपूर वासीयांसाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ला मान्यता देऊन या मतदारसंघातील आरोग्याच्या प्रश्नाला प्राधान्य दिले आहे. महाड विधानसभा मतदारसंघात यापुढे गावागावात वाड्यावाड्यांमध्ये भाजपा पक्ष वाढल्याची पहावयास मिळेल असा विरोधकांना टोला लगावत त्यांनी त्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले.

दक्षिण रायगड भाजपाचे जिल्हाध्यक्ष व रायगड लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार धैर्यशील पाटील यांनी कार्यकर्त्यांना संबोधताना सांगितले की भविष्यात रायगड जिल्हा परिषदेमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टी असेल व रायगड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे २० जिल्हा परिषद सदस्य निवडून येतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## आनंदी प्री प्रायमरी स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनी सुकापूर येथील आनंदी प्री प्रायमरी स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेतील विजेत्यांना सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, राजेश पाटील व अध्यक्ष मिलिंद शहा यांच्याकडून सत्कार करण्यात आला.

पनवेल सुकापूर येथे आनंदी प्री प्रायमरी स्कूलमध्ये (स्मार्ट किड अबॅकस) १३व्या नॅशनल व ६व्या आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत देशभरातील विविध राज्यामधील स्मार्टकिडच्या शाखेतील ३५००हुन अधिक विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये गट इ - २मधून प्रथम देवीका कदम, संस्कृती धरवडकर, ओम मोरे, अद्वैत कळमकर यांनी पटकवला. व्दितीय रितेश बोलाने व तृतीय आराधना आसवाले, साहील सय्यद अद्विका धरवाडकर व अंश राऊत यांना स्मार्ट किड अबॅकस अकॅडमीच्या संचालिक अक्षीता कळमकर व कोमल धरवाडकर यांचे मार्गदर्शन लाभले. या वेळी माजी जि. प. सदस्य अमित जाधव उपस्थित होते.



# कोकण विभागीय स्तरावरील प्रजासत्ताक दिन उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ७५ वा वर्धापन दिनाचा कोकण विभागीय स्तरावरील ध्वजारोहण समारंभ कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते झाला. नवी मुंबई पोलीस मुख्यालय मैदान, सेक्टर-१७, कळंबोली येथे हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या वेळी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, मान्यवर, नागरीक आदींना विभागीय आयुक्तांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या समारंभास नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र प्रवीण पवार, पोलीस सहआयुक्त संजय मोहिते आदी उपस्थित होते. या वेळी परेड कमांडर गजानन राठोड ,सहा.पोलीस आयुक्त तुर्भे, शांताराम वाघमोडे, राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय नवी मुंबई, एस.आर. पी.एफ,ग्रुप नं.११ प्लाटून, क्यु .आर.टी.पथक, नवीमुंबई, आर.सी.पी.पथक, नवी मुंबई, नवी मुंबई पोलीस पथक, नवी मुंबई महिला पोलीस पथक, नवी मुंबई वाहतूक पोलीस पथक, डॉग स्कॉड बॉम्ब शोधक/नाशक पथक, बँड पथक, वरून वाहन, वज्रवाहन, निर्भया पथक इरटिगा, फायर बुलेट, निर्भया पथक क्टीव्हा, अग्निशामक रेस्क्यु व्हॅन सिडको आदीनी विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.



## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात भारताचा ७५वा प्रजासत्ताक दिन विद्यालयाचे मराठी माध्यमाचे चेअरमन शरद खारकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाला.

या ध्वजारोहण समारंभासाठी उलवे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये माजी सरपंच कविता खारकर, राजेश खारकर, जगदीश खारकर, दिलीप कोळी, डॉ . श्रद्धा पाटील खारकर, गणेश देवकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी.हजारे, रयत शिक्षण संस्था सातारा मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, सी.बी. एस.ई.बोर्ड मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, इतर सन्माननीय ग्रामस्थ, शिक्षक वर्ग आजी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहण समारंभानंतर मराठी माध्यम चेअरमन शरद खारकर यांनी सर्वांना पंच्याहत्तरव्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शरद खारकर यांच्याकडून पाहूण्यांना व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.



## सीकेटी विद्यालयात प्रजासत्ताक दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात भारताचा ७५वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक संजय भगत, तसेच हरचंदसिंग सग्गू, जयराम मुंबईकर, जगदीश घरत, विजय म्हात्रे, त्याचबरोबर संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापक सुभाष मानकर, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका निरजा अधूरी, वैशाली पारधी, स्वाती पाटील, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी अध्यक्षपर भाषणातून आपले विचार व्यक्त करताना म्हटले की, स्वातंत्र्यातून स्वराज्य आणि स्वराज्यातून सुराज्य आणि सुराज्यातून रामराज्य आपण निर्माण करणार आहोत. त्यातूनच भारताला आपण विश्वगुरू बनविणार आहोत. कोरोना काळात भारताने स्वतःची कोरोना लस निर्माण करून संपूर्ण जगाला ही दिली आहे. आज भारत हा जगातील प्रमुख निर्यातदार देश बनला आहे.

यानंतर पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी माध्यम, प्राथमिक व माध्यमिक मराठी माध्यम व जुनियर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून भाषण नृत्य व गायन यांचे सादरीकरण केले.

# गिरवले ते सोमटणे रस्त्याचे भूमिपूजन

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शुभारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गिरवले ते सोमटणे रस्त्याचे आमदार महेश बालदी यांच्या ग्रामनिधीमधून तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. या कामाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. २७) भूमिपूजन झाले.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून पनवेल आणि उरण तालुक्यात विविध विकासाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यानुसार उरण विधानसभा मतदार संघातील गिरवले ते सोमटणे या रस्त्याचे काम मंजूर झाले आहे. या कामासाठी एक कोटी तीन लाख रुपयांचा निधी वापरण्यात येणार आहे. या कामाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी भूमिपूजन झाले.

या वेळी भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गाताडे, प्रवीण खंडागळे, तानाजी खंडागळे, सरपंच सुनील माळी, प्रवीण ठाकूर, सोमाटणे ग्रामपंचायतीच्या सरपंच तेजस्वी पाटील, उपसरपंच दीपा पाटील, सदस्य अविनाश मुंढे, सुवर्णा कांबळे, रजनी मुंढे, आंबो मुंढे, विशाल पाटील, कृष्णा मोरे, पुंडलिक दिघे, अतुल पाटील, भीमसेन मुंडे, धनंजय पाटील, रवींद्र कांबळे, आत्माराम पाटील, महिंद्र कांबळे, संदीप पाटील, चेतन पोपेटा, मंगेश पोपेटा, समीर बैकर, राजेश पाटील, गणेश बैकर, प्रमोद कुरंगले, जनार्दन पाटील, आत्माराम हातमोडे, मारुती पाटील, आतिश पोपेटा, प्रशांत मुंडे, प्रमोद पाटील, परेश चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# उलवेत चित्रकला स्पर्धा व आरोग्य शिबिर

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती; आयोजकांचे कौतुक

(छाया : अक्षय शार्दुल)





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

७५व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सुजग सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने आंतरशालेय चित्रकला स्पर्धा उलवे सेक्टर १८ येथे शुक्रवारी (दि. २६) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन त्यांना गुणगौरव केला. याचठिकाणी द मिलेनियम मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल आणि डायग्नोस्टीकच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

चित्रकला स्पर्धा जुनियर, सिनियर आणि दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते शशिकांत ठाकूर, युवा नेते सागर ठाकूर, उलवे नोड २ युवा मोर्चा उपाध्यक्ष विनय घरत, निखील घरत, विराज ठाकूर, सर्वेश ठाकूर, दैवत पाटील, संकेत घरत, अभित ठाकूर, पंकज म्हात्रे, दिवेश म्हात्रे, आशिष ठाकूर उपस्थित होते.

दरम्यान, आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला असून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिबिराला भेट देत आयोजकांचे कौतुक केले. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष योगेश वारे, शुक्रेश शेळके, सचिन बडे, प्रणित म्हसकर, शशी रंजन, नितीन पवार, कुष्माकर ओझा, उमेश लोखंडे, संजय मोरे, विकी बनसोडे आदी उपस्थित होते.

## नमो चषक अंतर्गत नृत्य स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात आयोजित भव्य कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव नमो चषक २०२४ अंतर्गत २८ व २९ जानेवारी रोजी कामोठेत नमो चषक नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कुल येथे होणाऱ्या या स्पर्धेचे आयोजक म्हणून नयना प्रकाश, अभिषेक भोपी, किरण हातेकर व सहकाऱ्यांवर जबाबदारी आहे. २८ जानेवारीला सकाळी १० वाजता तर २९ जानेवारीला सायंकाळी ०६ वाजता या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ५० हजार रुपयांची बक्षिसे तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी नयना प्रकाश (७७०००५२४२९), अभिषेक भोपी (९८२०७०२०४३) किंवा किरण हातेकर (८१०८४०५६५१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले होते.





**पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त ठिकठिकाणी सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल आणि कळंबोली परीसरात आयोजित सत्यनारायणाच्या पूजेला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, उमेश इनामदार आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

## कामोठे येथे अखंड हरिनाम सप्ताह

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे संत वामनभाऊ संत भगवानबाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने संत वामनभाऊ संत भगवानबाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि हभप मारुती महाराज शिंदे, भागवताचार्य हभप महेश महाराज साळुंखे, हभप गोरक्षनाथ महाराज घाडगे, हभप निर्वतीची महाराज धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संत वामनभाऊ संत भगवानबाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथीचे औचित्य साधून अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन २२ ते २६ जानेवारीदरम्यान करण्यात आले होते.

या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी भेट देत दर्शन घेतले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विकास घरत, भाजप नेते काका कुत्तरवडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या वेळी हभप राम महाराज शास्त्री आळंदी यांचे काल्याचे कीर्तन सादर करण्यात आले.



**(छाया : विकास म्हात्रे)**





**कामोठे : येथील सेक्टर ३४ प्लॉट क्रमांक ९१ व ९२ या ठिकाणी असलेला मोकळा भूखंड माजी नगरसेवक विकास घरत यांनी स्वखर्चाने साफ करून घेतला. या वेळी येथील रहिवाशांनी त्यांचे आभार मानले.**

# शिवाजीनगर येथे कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील जिल्हा परिषद शाळेत शिवाजी नगर गावाचे ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी व्ही.के. ठाकूर, टी.के. ठाकूर, जी.के.ठाकूर, शिवाजी ठाकूर, विजय ठाकूर, किशोर ठाकूर, सु.मा.ठाकूर, पांडू कडू, जगदीश ठाकूर, श्रीधर ठाकूर, निलेश ठाकूर, शनिदास ठाकूर, प्रवीण ठाकूर, नारायण ठाकूर, दर्शन ठाकूर, गजानन ठाकूर, वैभव ठाकूर, राजू ठाकूर, नितीन ठाकूर, राधाताई ठाकूर, नंदा ठाकूर, मंजुळा कडू, मालती ठाकूर, ज्ञानेश्वर ठाकूर, शिरिष कडू यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.







**कामोठे : रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल इंग्लिश मीडियम आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये ७५वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात शुक्रवारी साजरा झाला. या वेळी स्कूलचे चेअरमन आणि भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या सोहळ्याला पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक गोपीनाथ भगत, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, आशा भगत, मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांच्यासह पालक, विद्यार्थी आणि नागरिकांनी उपस्थित राहून राष्ट्रध्वजाला सलामी दिली.**



**पनवेल : भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण झाले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहराध्यक्ष अनिल भगत, महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**





**कामोठे : भाजपच्या आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात आणि सुषमा पाटील विद्यालयात ७५वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुषमा पाटील विद्यालयात पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि जनसंपर्क कार्यालयात भाजपचे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सलामी देण्यात आली. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, दिलीप पाटील, विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे तसेच मंदार पनवेलकर, रमेश गोवारी, भाऊ भगत, महिला मोर्चाच्या अध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चाचे चिन्मय समेळ यांच्यासह नागरिक उपस्थित होते.**



**पनवेल : रायगड जिल्हा वाहतूक सेलचे उपाध्यक्ष हेमंत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, भाजप पदाधिकारी जयवंत देशमुख, कोळी समाज जिल्हाध्यक्ष विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, साईचरण, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, अजय भगत आदी उपस्थित होते.**

# पन्ना की तमन्ना है की हीरा मुझे मिल जाए...








देव आनंद यशापयशाने थांबणारा नव्हताच. त्याच्याभोवतीच्या वलयात हिट फ्लॉपचा परिणाम होत नसे. पिक्चर हिट झाला तरी तो उत्साहात, फ्लॉप झाला तरी त्यात अडकून न पडण्यात जणू तत्पर. देव आनंद एक वेगळेच रसायन. तो देव आनंद होता हो देव आनंद...

पन्नाशी जवळ आली तरी 'हीरो'गिरी करीत असतानाच तो 'प्रेम पुजारी' (१९७०)पासून दिग्दर्शनात उतरला नि पहिल्याच प्रयत्नात फसला. म्हणून काय झालं? त्याने 'हरे राम हरे कृष्ण'ची तयारी सुरू केली. मुमताज नायिका, पण महत्त्वाचे होते ते हिप्पी कल्चरमध्ये एकदम 'सही' अथवा 'फिट्ट' बसणाऱ्या अभिनेत्रीची. पडद्यावरची त्याची बहीण हवी होती. जाहिदाने ('गॅम्बलर'मध्ये ती त्याची प्रेयसी असते.) नकार दिल्यावर देवपुढे प्रश्न पडला आता कोण? अशातच एका फिल्मी पार्टीत देव आनंदसमोरच त्या काळातील नवोदित अभिनेत्री झीनत अमान येऊन उभी राहिली. देव आनंदची पर्सनॅलिटीचं अशी भारी की त्याचं पाहणं बघूनच युवती त्याच्याकडे आकर्षित होत. तोपर्यंत झीनतचा पहिला चित्रपट ओ.पी. रल्हन दिग्दर्शित 'हलचल' (१९७०) पडद्याला बोज्या करून गेला होता. पब्लिकनेच न पाहिलेला पिक्चर देव आनंदनेही पाहिलेला असणं शक्यच नव्हते. या पार्टीत झीनत अमान देव आनंदच्या अगदी समोर येऊन उभी राहिली. आपल्या पर्समधून सिगारेट काढली, हातात धरली आणि देव आनंदकडे लायटर मागितला. पिक्चरमध्ये फिट्ट बसेल अशीच कडक सिच्युएशन. पन्नास-बावन्न वर्षांपूर्वी एकादी युवती सिगारेट ओढते हे एकदम धाडसी आणि एक्स्युझिव्हज असे. (आजच्या कार्पोरेट युगात खास युवतींसाठी सिगारेटचा वेगळे ब्रॅण्ड आहेत) देव आनंद या सगळ्या डेअरिंगबाज पिरियन्सकडे पाहतच राहिला. त्याला 'हरे राम हरे कृष्ण'मधील जसबीर सापडली. गॉसिप्स मॅगझिनमधून ही 'ग्रेट भेट' फारच रंगवून साकारली गेली. देव आनंद आणि मीडिया एकमेकांचे प्रिय होतेच. झीनतचे मॉडर्न असणे, दिसणे, वागणे, बोलणे नि वैचारिक व शारीरिक उंची त्याला भारी आवडली. एव्हाना देव आनंदनेही जणू कात टाकत मॉडर्न व्हायचं पाऊल टाकले होते.

हा पिक्चर १९७२च्या २१ जानेवारीला मुंबईत प्रदर्शित होण्यापूर्वीच झीनतची 'दम मारो दम गर्ल' इमेज लोकप्रिय झाली होती. इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्सपासून रेडिओ सिलोनवरील बिनाका गीतमालापर्यंत सगळीकडेच दम मारो दम मीट जाए गम आणि हरे रामा हरे कृष्णा (हे इंग्लिशमिश्रित) या गाण्यांची प्रचंड धूम होती. त्या काळात पिक्चर रिलीज झाल्याशिवाय गाणी पडद्यावर कशी दिसतात याची अजिबात कल्पना येत नसे आणि त्यातच गंमत असे. फर्स्ट शोपासूनच पिक्चर हिट, झीनत अमान स्टार.

आता पिक्चर हिट म्हणजे नवीन चित्रपटांच्या ऑफर हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वांत चलनी नाणे. झीनतची पहिली पसंती अर्थातच देव आनंद. त्याच्याच दिग्दर्शनातील 'हीरा पन्ना'मध्ये ती होतीच. आता दोन नायिका. एक राखी आणि दुसरी झीनत अमान. याच दिवसात गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'जोशीला' (१९७३)मध्ये हेमा मालिनी नायिका आणि कुछ भी करलो एक दिन तुमको या देव आनंदसोबतच्या स्टाईलिश रोमॅन्टीक गाण्यासह काही मोजकीच दृश्य असलेली भूमिका राखीने स्वीकारली होती. (यशजींसाठी की देव आनंदसाठी हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला, बरं का?) 'हीरा पन्ना'तही एक गाणे आणि काही दृश्ये एवढीच भूमिका तिने स्वीकारली. बंगालवरून मुंबईत आल्यावर राखीने हिंदी चित्रपट मिळवायच्या प्रयत्नात 'प्रेम पुजारी'च्या वेळी ती देव आनंदला भेटली होती, पण तोपर्यंत वहिदा रेहमान व जाहिदाची निवड झाली होती. ती भेट लक्षात ठेवूनच की काय राखीला तो संधी देत होता.


'हरे राम...'च्या खणखणीत यशानंतरचा देव आनंदच्या दिग्दर्शनातील चित्रपट म्हणून 'हीरा पन्ना'ची घोषणेपासूनच उत्सुकता. देव आनंद हा कुठेही असला तरी देव आनंदच असे आणि आपली शैली, इमेज, क्षमता व लोकप्रियता यानुसार वागे. 'हीरा पन्ना'चे मेहबूब स्टुडिओत सेट लावून पहिले चित्रीकरण सत्र पार पडल्याचे वृत्त आले, आनंद बक्षींची गाणी व राहुल देव बर्मनचे संगीत यातून काही गाण्यांचे रेकॉर्डिंग झाल्याचे फोटो मुद्रित माध्यमातून दिसू लागले (तेव्हा फक्त तेच माध्यम होते आणि जनसामान्यांपर्यंत अनेक गोष्टी पोहोचण्यास प्रभावी व पुरेसे होते). पिक्चरच्या फोटोत देव आनंद व राखी दिसत त्यापेक्षा देव आनंद व झीनत अमान जास्त लक्ष वेधून घेत. गळ्यात कॅमेरा अडकवलेला देव आनंद आणि कलरफुल बिकीनीतील झीनत अमान असा फोटो भारीच वाटे. (त्या काळात फक्त आणि फक्त इंग्लिश भाषेतील गॉसिप्स मुख्य रंगीत फोटो पाहायला मिळत आणि असे बोल्ड फोटो पाहताना आपल्याला कोणी बघत तर नाही ना याची फार फार काळजी घ्यावी लागे.(आजची डिजिटल पिढी



तुलनेत नशीबवान की काय?)

पिक्चर पूर्ण होता होता गाण्याची ध्वनिमुद्रिकाही मार्केटमध्ये आली. त्यावरही एका बाजूस जाळीच्या पाळण्यातील बिकीनीतील झीनत अमानचे फोटो काढणारा देव आनंद हाच हुकमी फोटो. मुख्य प्रवाहातील चित्रपटात इतकं मोकळंढाकळं तसं नवीनच होतं. अथवा बी.आर. इशारा, राम दयाल, फिरोझ चिनॉय यांच्या पिक्चरमध्ये असे, पण एव्हाना देव आनंद पाश्चात्य शैलीत रमणारा होता, त्यात हे फिट्ट होते. आनंद बक्षींच्या गाण्यांना राहुल देव बर्मनचे संगीत हे हिट्ट समीकरण मस्त जमले होते. मै तस्वीर उतारता हू (पार्श्वगायक किशोरकुमार), पन्ना की तमन्ना है की (लता मंगेशकर व किशोरकुमार), बहुत दूर तुझे जाना है (लता मंगेशकर व किशोरकुमार), एक पहेली है तू (आशा भोसले व किशोरकुमार) ही गाणी ऐकता ऐकताच लोकप्रिय झालीदेखील. देव आनंद व चित्रपट संगीत हे कायमस्वरूपी हिट्ट समीकरण. अनेक दिग्दर्शकांच्या चित्रपटातील गाण्यात त्याने रंग भरल्याचे त्याचे वैशिष्ट्य त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीतात कायम राहिले यात आश्चर्य नाही. पूर्वीच्या अनेक कलाकारांनी रूपेरी पडद्यावर अधिकाधिक उत्तमपणे गाणे साकारण्याची कला अवगत होती. उगाच ते मोठी खेळी जिंकले नाहीत.

'हीरा पन्ना'ची गाणी लोकप्रिय पण पिक्चर रिलीज होत नव्हते.




त्या काळात टप्प्याटप्प्याने चित्रपट प्रदर्शित होत (आजच्या शुक्रवारी मुंबईत तर पुढच्या शुक्रवारी दिल्लीत. त्यानंतर आणखी कुठे कुठे असा मोठाच वळणावळणाचा प्रवास. आपल्या गावात पिक्चर कधी येईल काय माहीत अशीच स्थिती) आणि त्या काळात चित्रपटाप्रमाणे मेन थिएटर मिळण्यासाठी निर्माते व वितरक वाट पाहत (चित्रपटाचा इतिहास असा बहुस्तरीय आहे.) काही कट्स देऊन पिक्चरला सेन्सॉरचे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे वृत्त आले. आता वाटले, पिक्चर लवकरच रिलीज होईल. त्यातही त्या काळातील चित्रपट वितरणातील दादा मॉडर्न मुव्हीजचे गुलशन रॉय हे नवकेतन फिल्मच्या 'गाईड'पासूनचे वितरक आणि त्यांच्या त्रिमूर्ती फिल्मच्या 'जॉनी मेरा नाम' (दिग्दर्शक विजय आनंद) आणि 'जोशीला' (दिग्दर्शक यश चोप्रा) यात देव आनंद नायक. तात्पर्य, सगळे समीकरण जमून आलेले. चित्रपट प्रेक्षकांपर्यंत आणण्यास अशी अनेक गणिते जमून यावी लागतात. चित्रपटाचे जग अशा अनेक लहान मोठ्या गोष्टींनी खच्चून भरलंय. असं असूनही गुलशन रॉय यांनी 'हीरा पन्ना'च्या मुंबई विभागातील वितरणाचे हक्क घेऊ नये? काय बरे व्यावसायिक अडथळा असावा?

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

या गडबडीत चित्रपट प्रदर्शित होणे लांबत गेले. इतके की १९७३ ही संपले (दिवाळीत रिलीज झालेला 'जोशीला'ही रसिकांनी नाकारला). १९७४च्या १ फेब्रुवारी रोजी 'हीरा पन्ना' रसिकांसमोर आला. त्याला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. म्हणूनच हा फोकस आणि त्यातही विशेष उल्लेखनीय गोष्ट या चित्रपटाच्या निमित्ताने नवकेतन फिल्म चित्रपट वितरण क्षेत्रात आले. हीदेखील एक बातमीच.

पिक्चरचे लेखन देव आनंद व सुरज सनिम यांचे. कला दिग्दर्शन टी. के. देसाई यांचे छायाचित्रणकार फली मिस्त्री यांचे, तर संकलन बाबू शेख यांचे. देव आनंदची टीम हुकमी. त्याच्या उत्फूर्तपणात सूर मिसळणारी.

थीम काय? फोटोग्राफर हीरा भंडारी (देव आनंद) आणि एअर हॉस्टेज अर्थात हवाई सुंदरी रीमा सिंग (राखी) यांचे प्रेमसंबंध छान रूजत असलेले. अशातच एका विमान अपघातात रीमाचे दुर्दैवाने निधन होते आणि त्यामुळे उदास उदास झालेला हीरा आपल्या फोटोग्राफीत मन गुंतवतो. अशातच राजासाब (रेहमान) यांचे फोटो काढत असतानाच पन्ना (झीनत अमान) त्यांचे किमती हीरे चोरून ते हीराच्या फॅशनेबल गाडीच्या पेट्रोलच्या टाकीत टाकते. आता हे हीरे तेथून मिळवायचे तर हीराशी मैत्रीचे नाटक करायला हवे. तो सुचवेल, सांगेल तसे बिकीनीत फोटो काढू देते, तर हीराला हे हीरे सापडताच ते तो पोलीसांकडे द्यायचे ठरवतो. तेव्हा ती आपण हे हीरे चोरले होते हे सांगते, पण का? तर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनिलने (धीरजकुमार) पन्नाला धमकी देत आपल्या गुन्हेगारी टोळीत सामील केलेले असते. आपली ही स्टोरी ती सांगत असतानाच हीराच्या गळ्यातील लॉकेटमधील रीमाचा फोटो ती पाहते आणि आपण रीमाच्या बहीण आहोत असे हीराला सांगते. आता हीरा पन्नाला गुन्हेगारी टोळीतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतो आणि पिक्चर शेवटच्या भागाकडे जातो. आता यात एक गंमत आहे, पन्ना की तमन्ना है की 'हीरा' मुझे मिल जाए हे पन्ना गाते ते 'गाडीत लपवलेल्या हिरे' डोळ्यांसमोर ठेवून, फोटोग्राफर हीराला उद्देशून नाही. (येथे दिग्दर्शक दिसतो असं अजिबात म्हणायला नको.)

स्टोरीत फार नाट्यमय असे काहीच नाही. त्या काळात अनेक चित्रपटांत 'हीरे चोरी' हा कॉमन फॅक्टर असे. (व्हीक्टोरिया नंबर २०३पासून छैला बाबूपर्यंत अनेक चित्रपटांत ते दिसले). देव आनंद संपूर्ण चित्रपटभर आपण देव आनंद आहोत या ऐटीत छान वावरलाय. त्याचा उत्साह आपण अनुभवावा यासाठीच राखीने काम केल्याचे जाणवते आणि झीनत अमानने आपली 'दम मारो दम गर्ल' इमेज अधिकच मोकळेढाकळेपणे पडद्यावर आणली, त्याला अभिनय म्हणता येणार नाही. ती म्हणेल, तसं तुमचे सर्टिफिकेटही नको. चित्रपटात जीवन, रेहमान, ए. के. हनगल, धीरजकुमार, सुधीर, पेंटल, शीतल, मनमोहन, मॅकमोहन यांच्याही भूमिका.

त्या काळात हिट गाणी पहायची तर थिएटरला जाण्याशिवाय पर्यायच नसे. 'हीरा पन्ना'ला जे काही सर्वसाधारण यश मिळाले ते त्यातील गाण्यामुळेच आणि लोकप्रिय गाणी चित्रपटाला सतत रसिकांसमोर ठेवत असतात आणि त्या काळात असा हिट गाणीवाला पिक्चर मॅटीनी शोला यायची आम्ही वाट पहात असू. तसा तो येई. देव आनंदचे अनेक चित्रपट असेच मॅटीनी शोला येत असत आणि पाहून होत.

'हीरा पन्ना'त दिग्दर्शक देव आनंद फारसा दिसला नाही, पण झीनत अमानच्या तो प्रेमात तो नाही ना आणि तीही त्याच्याकडे आकृष्ट झालेली नाही ना असे मात्र वाटले. (पिक्चर पहायचा म्हणजे फक्त गोष्ट पाह्यची नसते हो आणि गोष्टीत दम नसेल तर असं काही असतेच). जोडीने 'कलाबाज', 'वॉरंट', 'डार्लिंग डार्लिंग', 'प्रेम शास्त्र', 'इश्क इश्क इश्क' या चित्रपटातून जोडीने काम केल्यावर एका फिल्मी पार्टीत झीनत अमान राज कपूरसोबत आली आणि नवीन गॉसिप्स जन्माला आले. तोपर्यंत देव आनंद टीना मुनिमसोबत 'देस परदेस'च्या शूटिंगमध्ये रमलादेखील.

'हीरा पन्ना' त्याचा एक दिग्दर्शनीय नमुना होता इतकेच म्हणायचे नि यूट्यूबवर त्यातील गाणी एन्जॉय करायची. पन्नास वर्षांनंतरही ही गाणी पुन्हा पुन्हा तजेलदार वाटतात ही देव आनंद पुण्याई.

# असंघटित क्षेत्रातील कामगारांची गृह स्वप्नपूर्ती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रत्येकाला घर देण्याचे स्वप्न आहे. त्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री आवास योजना व अन्य घरकुल योजनांची कामे देशभरात वेगाने सुरू आहेत. यामध्ये बेघर व्यक्तींना लवकरात लवकर घर मिळण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील रे नगर, कुंभारी येथील असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० हजार घरकुल प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील १५,०२४ घरांचे लोकार्पण नुकतेच (१९ जानेवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. हा गृह प्रकल्प देशातील सर्वांत मोठा गृह प्रकल्प आहे.

सामान्यांच्या घरकुलाचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राबविण्यात येते. राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेच्या नागरी प्रकल्पांना गती देऊन लाभार्थ्यांना विहीत मुदतीत घरे देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचा ग्रामीण भागात मोठा लाभ नागरिकांना मिळत आहे. त्याच पद्धतीने शहरी भागातील नागरिकांनादेखील अधिकाधिक लाभ मिळावा हा मुख्य हेतू या योजनेमागे आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील रे नगर येथे असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी



हा प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) राबवत आहे, त्याला केंद्र सरकारच्या पीएमएवायचेदेखील सहाय्य आहे.

कामगारांचे शहर अशी सोलापूरची ओळख आहे. आधी सूतगिरणीमध्ये काम करणारे आता वस्त्रोद्योग, विडी उद्योग, बांधकाम अशा विविध क्षेत्रात हजारो कामगार सोलापुरात काम करतात. संपूर्ण आयुष्य झोपडपट्टीत घालवणाऱ्या या कामगारांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न या प्रकल्पातून साकार होताना दिसत आहे. देशातील सर्वांत मोठी कामगार वसाहत सोलापुरातल्या रे नगर येथे साकारली आहे.

देशातील पहिलाच असंघटित कामगारांसाठीचा हा गृहप्रकल्प आहे. हा प्रकल्प ३६५ एकर जागेवर विकसित होत आहे. या प्रकल्पामध्ये एकूण ८३३ इमारती असून प्रत्येक इमारतीत ३६ घरे आहेत. कचरा उचलणारे, विडी कामगार, बांधकाम कामगार, वस्त्रोद्योग कामगार इत्यादी असंघटित क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी ही घरकुले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त पायाभूत सुविधा व बीज भांडवलाकरिता राज्य शासनाने अर्थसाहाय्य दिले आहे. पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सांडपाणी व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांबरोबरच सोलार व डिजिटल पत्ता या सुविधाही पुरविण्यात आल्या आहेत. या प्रकल्पात उजनी जलाशयातून पाणीपुरवठा, मलशुद्धीकरण केंद्र स्वतंत्र घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा, शाळा, अंगणवाडी, खेळाचे मैदान, रुग्णालय, कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, रुफटॉप सोलर योजना, रेन वॉटर हार्वेस्टिंग या सुविधा प्रत्यक्ष कार्यान्वित करून या घरकुलांचे हस्तांतरण करण्यात येत आहे.

सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जून २०१५मध्ये प्रधानमंत्री आवास योजना सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत शासन सर्व पात्र कुटुंबांना आणि लाभार्थ्यांना घरे देण्यासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय नोडल एजन्सीमार्फत अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत करते. शहरीकरण आणि वाढत्या आर्थिक प्रकल्पांमुळे शहरी भागात परवडणाऱ्या घरांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना मदत करणे आणि त्यांना कायमस्वरूपी घरे उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश आहे.

देशातील प्रत्येक कुटुंबाला नळजोडणी, शौचालयाची व्यवस्था, २४ तास वीज व पोहच रस्ता या सुविधांसह पक्के घर असायला हवे असे विचारात घेऊन प्रधानमंत्री यांच्या सन २०२२पर्यंत 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयाने २५ जून २०१५ रोजी सर्वांसाठी घरे या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित करून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनाकडून ९ डिसेंबर २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून ही योजना राज्यामधील ४०९ शहरांमध्ये लागू करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या सर्वांसाठी घरे २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे, कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. खासगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान देणे हे चार घटक समाविष्ट आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी कुटुंबांतील व्यक्तीच्या मालकीचे (पती, पत्नी व अविवाहित मुले) पक्के घर भारतामध्ये नसावे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांस केंद्र शासनाचे १.५ लक्ष व राज्य शासनाचे एक लाख या प्रमाणे २.५ लक्ष अनुदान प्राप्त होते. केंद्राचे सहाय्य ३० चौ. मी. चटई क्षेत्रपर्यंतच्या आर्थिक दुर्बल घटकांच्या घरकुलांसाठी अनुज्ञेय आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी राज्य शासनाने शासकीय जमिनी १०० प्रती रुपये चौ.मी. या नाममात्र दराने वितरीत करणे, मोजणी शुल्कात ५० टक्के सवलत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न घटकातील लाभार्थ्यांना सदनिकेसाठी एक हजार रूपये मुद्रांक शुल्क, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी दोन लाख रुपये इतके अतिरीक्त या सवलती मंजूर केलेल्या आहेत.

**-शैलजा पाटील,**
**सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# संगीत मार्तंड पं. जसराज

स्वरांच्या साडेतीन सप्तकांमध्ये फिरणारे, सुमधुर आवाजाची देणगी लाभलेले, जसरंगी जुगलबंदी या अनोख्या गायन प्रकाराचं भारतीय संगीतसृष्टीला योगदान देणारे आणि आपल्या गायनाद्वारे रसिकांना ईश्वरानुभूती देणारे तपस्वी गायक तसंच देश-विदेशातल्या अनेक विद्यार्थ्यांना गुरूकुल पद्धतीने शिक्षण देऊन संगीतसंपन्न वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचवणारे गानगुरू म्हणजे पंडित जसराज.



पंडित जसराज हे ८० वर्षांहून अधिक काळ संगीत क्षेत्रात कार्यरत होते. त्यांचे वडील मोतीराम हेसुद्धा मेवाती घराण्याचे गायक होते. त्यांना वयाच्या चौथ्या वर्षी वडील पं. मोतीराम यांच्याकडून तालीम मिळाली. जसराज यांच्या बालपणाचे काही दिवस हैदराबादच्या गल्ली-मोहल्ल्यात गेले. बेगम अख्तर यांच्या गजला, 'दिवाना बना है तो दिवाना बना दे, वरना तकदीर कही तमाशा न बना दे' ऐकत असत. या गजलनेच त्यांना शाळा सोडायला लावली आणि मग ते स्वतः तबला वाजवू लागले. तबलजी हे गायकाच्या तुलनेत इतर साथीदारांना दुय्यम समजले जाते हे कळल्यामुळे ते अतिशय व्यथित झाले आणि मग त्यांनी तबला वाजवायचे सोडून गायक बनायचे ठरवले.

अनेक वर्षांनी जसराज यांना लाहोरमध्ये गायक कलाकाराच्या रूपात मंचावर मुख्य आकर्षण म्हणून यावे हे सुचले आणि मग गायक होण्यासाठीचा दीर्घ संघर्ष सुरू झाला. एका मैफलीमध्ये त्यांचे गायन ऐकून 'तुम तो सुन्नी शागीर्द हो' अशा शब्दांत तबलानवाज उस्ताद आमीर हुसेन खाँ यांनी गौरव केला होता. उस्ताद अमीर खाँ साहेब, गुलाम अली खाँ आणि ओंकारनाथ ठाकूर यांचे गाणे त्यांना खूप आवडायचे.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताला आराध्य मानणारे पंडित जसराज हे चित्रपटसृष्टीत फारसे रमले नाहीत. २००८मध्ये त्यांनी एका चित्रपटासाठी गाणे गायले. त्यानंतर विक्रम भट दिग्दर्शित '१९२०' या चित्रपटासाठी 'वादा तुमसे है वादा' हे गाणे गायले.

पं. जसराज म्हणत असत की संघर्ष, मेहनत, रियाज सर्व गोष्टी जीवनात आवश्यक आहेत. त्याच संघर्षात कामी येतात. आपल्या जीवनात पंडीतजींनी अनेकांना जमिनीवरून आकाशात जाण्याचा मार्ग दाखवला आहे. माणसाला जेव्हा स्वतःचा गर्व होतो तेव्हा तो संपतो. त्याच्या संघर्षांच्या कक्षा संपतात. गायचे असेल तर शिकत रहा, रियाज करत राहा आणि परमेश्वराच्या कृपेची वाट पहा.



पं. जसराज कोणालाही भेटले की त्यांच्या तोंडून बाहेर पडत असे ते, जय हो. पं.जसराज यांची कन्या दुर्गा जसराज यांच्या संकल्पनेतून पंडितजीचा जीवनपट उलगडणारी 'गोल्डन व्हॉइस गोल्डन इयर्स' ही चित्रफीत साकारली आहे. कला जिवंत राहावी, ती पुढच्या पिढीमध्ये रुजावी यासाठी जसराजजी प्रयत्नशील होते. पं. जसराज यांचे काम ऐवढे मोठे आहे की आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघाने (आयएयू) ११ नोव्हेंबर २००६ रोजी सापडलेल्या एका ग्रहाला पं. जसराज यांच्या सन्मानार्थ पंडितजराज असे नाव दिले होते. असा मान मिळवणारे ते पहिले भारतीय कलाकार होते. पं. जसराज यांचा आवाज २०१२मध्ये दक्षिण ध्रुवावर अंटार्क्टिका येथेही दुमदुमला होता.

सात महाद्वीपांवर गाणारे ते पहिलेच हिंदुस्थानी गायक होते! साणंद येथील महाराज महाराणा जयवंतसिंगजी यांना ते आध्यात्मिक गुरू मानायचे. आपल्यापैकी खूप जणांना माहीत नसेल की जसराज हे व्ही.शांताराम यांचे जावई. पत्नी मधुरा या चित्रपती व्ही. शांताराम यांच्या कन्या होत. भारत सरकारने संगीत क्षेत्रातील कामगिरीबद्दल पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण असे पुरस्कार देऊन जसराज यांना गौरवले होते. केवळ भारतच नव्हे तर इतर देशांमध्येही त्यांचे चाहते होते. पं. संजीव अभ्यंकर, कला रामनाथ आदी शिष्य त्यांनी घडवले आहेत. त्याचप्रमाणे अमेरिका आणि कॅनडामध्ये त्यांचे शिष्य आहेत. पं. जसराज मागील काही दिवसांपासून आपल्या कुटुंबासह अमेरिकेत राहत होते. १७ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले.

**-संजीव वेलणकर**

# समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध

## मंत्री आदिती तटकरे यांचे ध्वजारोहण कार्यक्रमात प्रतिपादन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

समाजातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार, दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. तसेच रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे पर्व निरंतर सुरु रहावे, यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले.



पोलीस मुख्यालयाच्या मैदानात भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी आयोजित दिमाखदार सोहळयात जिल्ह्यातील नागरिकांना संबोधित करताना त्या बोलत होत्या.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड , जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) विठ्ठल इनामदार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जगदीश सुखदेवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या, आदी मान्यवर व इतर अधिकारी,कर्मचारी, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वप्रथम ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. त्यानंतर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ७५ व्या प्रजासत्ताकदिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा महिला व बालविकास मंत्री तटकरे व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## पनवेलच्या शासकीय अध्यापक महाविद्यालय राष्ट्रीय मतदार दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक प्रतिक स्मिता उत्तम पवार यांनी प्राचार्य, प्राध्यापक वृंद तसेच सर्व उपस्थित छात्राध्यापकांना प्रतिज्ञा दिली. त्यानंतर रॅलीचे आयोजन करण्यात आली.

या रॅलीकरिता प्रत्येक छात्राध्यापकाने मतदान जनजागृतीसंबंधित पोस्टरवर घोषवाक्य लिहून आणले होते. ही रॅली महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रमा भोसले यांच्या प्रेरणेने आणि प्रा. बिजली दडपे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

याचबरोबर या रॅलीकरिता प्रा. डॉ. बी. जी. खाडे, प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार, प्रा. डॉ. नीलिमा मोरे व प्रा. डॉ. उज्वला डोणे यांनी सर्व छात्राध्यापकांना प्रोत्साहित केले. द्वितीय वर्षाच्या छात्राध्यापकांनी सादर केलेल्या पथनाट्याने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २६) सकाळी ८ वाजता भाजप खारघर मंडल अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रवीण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले

या वेळी प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून विद्यार्थी व विद्यार्थिनीना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. या ध्वजारोहण सोहळ्यासाठी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक माध्यमिक विद्यालय खारघरच्या मुख्याध्यापिका निशा नाय, प्रा.डॉ. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष), सचिन वासकर, जयदास तेलवणे, इरशाद शेख तसेच दीपक शिंदे (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) तसेच महाविद्यालयात सर्व विभागाचे विभाग प्रमुख, समिती प्रमुख, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी हे सर्व या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन मुख्य लिपिक नितीन वासकर व अजिंक्य भगत फिजिकल डायरेक्टर यांनी केले व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील व रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहुन सहकार्य केले.



# पत्रकारांना सिडकोची घरे मिळण्याचा मार्ग सुकर

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानुसार सिडको महामंडळाच्या गृहनिर्माण योजनांमधील पत्रकार प्रवर्गातील घरांकरिता अर्ज करण्यासाठी राज्याच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाकडून प्राप्त कराव्या लागणाऱ्या पात्रता प्रमाणपत्राची अट शिथिल करण्यात आली असून सिडको महामंडळाकडूनच योग्य ती शहानिशा करून, पत्रकारांची पात्रता निश्चित करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे पत्रकार बांधवांना सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील घरे मिळण्याचा मार्ग सुकर झाला असून त्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होण्यासही मदत होणार आहे.

सिडकोकडून सातत्याने गृहनिर्माण योजनांद्वारे सर्व आर्थिक स्तरांतील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून दिली जातात. तसेच



सिडको गृहनिर्माण योजनांतील सदनिका या विविध प्रवर्गांप्रमाणेच पत्रकारांसाठीही राखीव ठेवण्यात येतात. यापूर्वी पत्रकारांना, पत्रकार प्रवर्गातील सदनिकेसाठी अर्ज करताना महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क संचलनालयाकडून ते पत्रकार प्रवर्गातील असल्याबाबतचे पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक होते. परंतु या प्रक्रियेमध्ये काही प्रमाणात कालापव्यय होत असल्याने, पात्रता प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या पत्रकारांना सदनिकेचे वाटपत्र देण्यास विलंब होत असे.

पत्रकार बांधवांची होणारी ही गैरसोय टाळण्यासाठी व त्यांना सिडकोच्या योजनेतील घरे मिळण्याचा मार्ग प्रशस्त व्हावा याकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिडकोला दिलेल्या निर्देशानुसार शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाकडून प्राप्त कराव्या लागणाऱ्या पात्रता प्रमाणपत्राची अट सिडकोकडून शिथिल करण्यात आली आहे. यापुढे हे प्रमाणपत्र सिडको स्तरावर निर्गमित करण्यात येणार असून पत्रकार अर्जदारांची पात्रता सिडकोकडूनच निश्चित करण्यात येणार आहे.

सिडकोने घेतलेल्या या निर्णयाचा फायदा अनेक पत्रकार बंधू-भगिनींना होणार असून नवी मुंबईसारख्या पायाभूत सुविधांनी परिपूर्ण आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरात हक्काचे घर घेण्याचे त्यांचे स्वप्न साकार होणार आहे. तसेच नवी मुंबईतील पर्यावरण आणि निसर्गाशी उत्तम मेळ साधणाऱ्या दर्जेदार जीवनशैलीचा अनुभव घेण्याची संधीही त्यांना मिळणार आहे.

**समाज आणि शासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करणाऱ्या पत्रकार बंधू-भगिनींप्रति कृतज्ञता म्हणून शासनाने हा निर्णय घेतला आहे.**
**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**सिडकोने कायम पत्रकारांचा सन्मान केला आहे. पत्रकारितेविषयक उपक्रमांसाठीही सिडकोने नेहमीच सहाय्य केले आहे.**
**-अनिल डिग्गीकर, उपाध्यक्ष, सिडको**

# पनवेल पालिका मुख्यालयात ध्वजारोहण

**पनवेल : प्रतिनिधी**

प्रजासत्ताकदिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने मुख्यलयाच्या जवळील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर शुक्रवारी प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महापालिकेच्या १० शाळांमध्ये ही ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे केली.

या वेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, नगर रचना संचालक ज्योती कवाडे मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी,मुख्य अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, उपमुख्य लेखा परीक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, माजी नगरसेवक यांच्यासह पालिकेतील सर्व विभांगाचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी , शाळांचे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, नागरिक, पत्रकार उपस्थित होते.

यावेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल,पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले तसेच ध्वजाला मानवंदना दिली. तसेच सुरक्षा रक्षकांनी बाईक स्टंट सादर केले.



# मॉडर्न स्कूलमध्ये राष्ट्रीय मतदार दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक विभागात मतदान प्रक्रियेद्वारे आदर्श विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

प्रत्येक तुकडीतून सर्वगुण सहा विद्यार्थ्यांना उमेदवारी देण्यात आली होती. मतदार यादीतील नावे तपासणे, स्वाक्षऱ्या घेणे, ओळखपत्र तपासणे, बोटाला शाई लावणे या प्रक्रिया येथे पार पाडण्यात आल्या. या निवडणुक प्रक्रियेमध्ये मुलींमध्ये गौरी चंद्रप्रकाश शिंदे तर मुलांमध्ये पार्थ मनोज वातेरे आदर्श विद्यार्थी म्हणून निवडून आले.

विजयी विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. या प्रक्रियेत शिक्षक आणि पालकांनीही मतदान केले. मुख्याध्यापक आर. ई. वाघ यांच्या संकल्पनेतून झालेल्या या उपक्रमासाठी मतदान प्रकिया प्रमुख एन. बी.वामन यांच्यासह शिक्षकांनी सहकार्य केले.




## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री. रामदास भाऊ शेळके यांचे मालकीची, ताबेकबजातील मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत आहे. सदर मिळकत आमचे आशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| गट क्र./सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २० | १ | ०-२५-०० पो. ख. ०-०१-०० | ४.५६ |

सदर मिळकतीमध्ये अगर सदर मिळकतीचे कोणत्याही भागावर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, मालकीहक्क, ताबाकबजा, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी, हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून, १५ दिवसांच्या आंत त्यांची हरकत कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध, विनाहरकत व बोजारहित आहे, असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक -२७/१/२०२४**

**सही/-**
**ॲड. श्री. एकनाथ जी. खुटले**
कार्या. : शॉप नं. १, पारस प्लाझा, जुने प्रांत ऑफिससमोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
पिन. ४१० २०६ मो.नं. ९८६७१३२०२२

## जाहीर सूचना

### माऊली को. ऑफ. हौ. सोसायटी लि.

रजि. नं. : एन्.बी.ओ.एम्./सिडको/एच्.एस्.जी.(ओ.एच्.)/८३८जेटीआर/९९-२०००.दि.२२/११/९९
**प्लॉट १९, सेक्टर ०१, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, (प.), रायगड ४१०२०६**

सोसायटीच्या विद्यमान इमारतीच्या निवासी आणि व्यावसायिक वापरासाठी या सोसायटीच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील नामनिर्देशित आणि पात्र **प्रकल्प व्यवस्थापक / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)** यांच्याकडून याद्वारे सीलबंद निविदा मागवण्यात आल्या आहेत. सोसायटी **भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ 1519.76 चौ.मी** आहे. सोसायटी भूखंड सिडकोने सोसायटीला दिला आहे. पूर्वेला प्लॉट क्र. 18A, आणि 18, दक्षिण आणि पश्चिमेला PL5B सिडको इमारती आहेत. उत्तरेकडे 20 मीटर रुंद रस्ता देखील आहे. सध्या इमारतीत ५८ निवासी सदनिका आणि ०९ दुकाने आहेत. रिक्त निविदा दस्तऐवज रुपये 5000/- (नॉन-रिफंडेबल) **"Maauli Co. Op. Hsg. Society Ltd."** च्या नावे डीडी देऊन शनिवार 10.02.2024 पर्यंत सर्व दिवस सायंकाळी 4.00 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत खरेदी केले जाऊ शकतात. आणि सोमवार 12.02.2024 पर्यंत सर्व दिवस संध्याकाळी 4.00 ते रात्री 8.00 या कालावधीत संपूर्ण निविदा सोसायटीच्या कार्यालयातील ड्रॉप बॉक्समध्ये सीलबंद लिफाफ्यात टाकल्या पाहिजेत. निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार सोसायटीच्या समितीकडे आहेत.

खरेदी आणि निविदा स्वीकारण्यासाठी संपर्क. :-
१) श्री. शिवाजी आबा कदम. (अध्यक्ष) :- ९०२९८४६५१४
२) श्री. विनोद मोहनराव मलाले (सचिव) :- ९८६९७९००६६
3) श्री. शंकर विष्णू नाईक (खजिनदार) :- ८१६९८२७१२८
4) श्री. संतोष सदानंद पोकळे (समिती सदस्य) :- ९९२०२४२५९५

स्वाक्षरी,
अध्यक्ष / सचिव,
माऊली को. ऑफ. हौ. सोसायटी लि.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील कब्जेदार यांचे नावे असलेली, तार्बकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुदद् स्वरूपाची खालील वर्णनावी शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे लोणिवली, तालुका पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| प्रविण काशिनाथ हावरे | १६९ | १/४/५ | ०-९३-२० पो.ख. ०-२३-३० **एकुण क्षेत्र १-१६-५०** | ९.४३ |
| वैभव विष्णू भगत वगैरे ५ | १९५ | ६ | ०-६९-५० पो.ख.०-१३-९० **एकुण क्षेत्र ०-८३-४०** | १६.०० |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, या मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधावे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारवी हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, यादी तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक - २७/१/२०२४**

**सही/-**
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्पलेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड,
मो. ९८२०६०७५७२/९३२४३७२१६६/९३२२६५२३१९
Email-vijaybhagat43@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शैती मिळकत त्या मिळकतसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडुन आमचे अशिल **१) सौ प्रमिला संतोष पाटील २) संतोष दगडू पाटील, रा. उसाटणे, ता.जि. ठाणे.** हे विकत घेणार आहेत सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत, सदर शेत मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे महोदर, ता. पनवेल जि. रायगड.**

| मालक/कब्जेदाराचे नांव | गट क्र . व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १) श्री. लक्ष्मण चंदर दाढावकर<br>२) श्री. संजय चंदर दाढावकर<br>३) श्रीम. जनाबाई चांगदेव धोंगडे<br>४) श्रीम. मनुबाई नामदेव भोपी<br>५) श्रीम. शांताबाई आल्या भागवत<br>६) श्रीम. शांताबाई रामा घरत<br>७) श्रीम. हौसाबाई चंदर दाढावकर<br>८) श्रीम. बेबी अनंता दाढावकर<br>९) श्री. सोमनाथ अनंता दाढावकर<br>१०) श्री. राजेश अनंता दाढावकर<br>११) श्रीम. फशीबाई रामचंद्र दाढावकर<br>१२) श्री. रविंद्र रामचंद्र दाढावकर<br>१३) श्री. धनंजय रामचंद्र दाढावकर<br>१४) श्रीम. वैशाली काळूराम म्हात्रे | १६७<br><br>पैकी क्षेत्र | ००-३३-०० पो.ख. ०-०२-२० **एकूण ०-३५-२०**<br><br>०-१७-५० | |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक -२७/१/२०२४**

**सही/-**
**श्री. प्रफुल्ल विठोबा पाटील**
ॲडव्होकेट हायकोर्ट व नोटरी (भारत सरकार)
११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर,
पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.

# पनवेल परिसरात प्रजासत्ताक दिन उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गव्हाण, कोपर येथे ध्वजारोहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

७५वा प्रजासत्ताक दिन देशभरात उत्साह आणि जोशपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पनवेल परिसरात विविध ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. यात कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालय, जिल्हा परिषदेची मराठी शाळा, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, आणि गव्हाण ग्रामपंचायतीच्या आवारात ध्वजारोहण झाले. या वेळी उपस्थितांनी तिरंग्याला सलामी दिली.

यामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आणि जनार्दन अत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि टी. एन. घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत अनंता ठाकूर, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रघुनाथशेठ घरत आणि गव्हाण ग्रामपंचायतीच्या आवारात ग्रामविकास अधिकारी विजय कुमार राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

परिसरात विविध ठिकाणी झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, भाऊशेठ पाटील, रतनशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, विश्वनाथ कोळी, रघुनाथशेठ घरत, रामदास पाटील, भाऊ भोईर, वामन म्हात्रे, अजय भगत, हेमंत ठाकूर, ग्रामपंचायत सदस्या योगिता भगत, कामिनी कोळी, उषाताई देशमुख, कमलाकर देशमुख, अमृत भगत, किशोर पाटील, अनिल देशमुख, रघुनाथ देशमुख, राजेंद्र देशमुख, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, युवा नेते साईचरण म्हात्रे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, गव्हाण विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रणिता गोळे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

## दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या पनवेल महापालिकेच्या आठ वाहनांचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वत्त**

पनवेल महापालिकेच्या दैनंदिन कामकाजासाठी लागणाऱ्या विविध आठ वाहनांचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २६) करण्यात आले. पनवेल महापालिका आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा लोकार्पण सोहळा झाला.



या वाहनांमध्ये उद्यान विभागासाठी लागणारे रस्त्यांच्या डिव्हाइडरमधील झाडांना पाणी घालण्यासाठी पाण्याचे टँकर, स्ट्रीट लाईटमध्ये येणाऱ्या झाडांच्या फांद्या तसेच इतर अडथळे दूर करण्यासाठी विद्युत विभागासाठी स्काय लिफ्ट वाहन आणि पावसाळ्यापूर्वीच्या वृक्ष छाटणीसाठी वृक्ष प्राधिकरण विभागासाठी स्काय लिफ्ट वाहनाचा समावेश आहे.

या लोकार्पण सोहळ्यावेळी आयुक्त गणेश देशमुख, उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके, अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, तहसीलदार विजय पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, नगर रचना संचालक ज्योती कवाडे, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, उपमुख्य लेखा परीक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे आदी या वेळी उपस्थित होते.




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १० येथील बिनेदार कॉर्नर व आम्रपाली बुद्धविहार या ठिकाणी बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहाराचे संस्थापक–अध्यक्ष, माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या वेळी बहुसंख्येने त्यांचे महिला पुरुष कार्यकर्ते तसेच अनेक स्थानिक मंडळाचे, संस्थेचे, संघटनेचे व पक्षाचे प्रतिनिधी, सभासद, कलाकार व पत्रकार उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यास स्वाती बिनेदार, पत्रकार श्याम साळवी, संदेश जाधव, सुजित खंडिझोड, अमोल जाधव, अशोक मिसाळ, मोहन कंठे, सुभाष कांबळे, निवृत्ती कांबळे, जितेंद्र खैरे, अक्षय मिसाळ, रेखा खंडिझोड, सुमित्रा जाधव, ममता गमरे, कमल कांबळे, कविता पवार, माया खरात, सुलोचना पाटील, प्रमिला वानखेडे, संतोष म्हस्के, दत्ता जाधव, विकास राणे, योगेश शिंदे, दिनेश मांडरे, राहुल मनसुरे, मुमताज मन्सूरी आदींनी मोलाचे सहकार्य केले.

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सालाबादप्रमाणे याही वर्षी खारघर शहर भाजप मंडळात ७५वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. या वेळी सैन्य दलातील निवृत्त अधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कर्नल आर. के. वर्मा, कमांडर पुरणचंद चौधरी, मेजर नरेंद्रकुमार शर्मा, शिवप्रसाद थपालियाल हे अधिकारी उपस्थित होते. कर्नल वर्मा व मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाविषयी अधिक माहिती दिली.




खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, ॲड. नरेश ठाकूर, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, माजी नगरसेविका अनिता वासुदेव पाटील, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, सोशल मीडिया प्रदेश सदस्या मोना अडवानी, जिल्हा संयोजिका प्रज्ञा प्रकोष्ट गीता चौधरी, रामकुमार चौधरी, आर के भोईर, अजय माळी, अक्षय लोखंडे, राहुल शिंदे, अमित बोधाई, रूपेश चव्हाण, विवेकानंद कुशवाह, मोहमद मिया, अशोक जंगीड, अशोक पवार, अभिषेक देहाडे, संदेश वाडीकर, प्रज्वल आवळे, देहाडे, अभिजीत देहाडे, सोनल लाहा, शोभा मिश्रा, नीलम विसपुते, प्रिया हनमंते, स्नेहल बोधाई, सुशीला शर्मा, डॉ. ज्योती जाधव, दुर्गा बंसल, भाग्यश्री, उषा चंद्रा, भावना निंबार्क स्मिता भारती आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बामणडोंगरी गाव जिल्हा परिषद शाळेत झेंडावंदन बामणडोंगरी गावचे सुपुत्र पीएसआय अलंकार पदाजी म्हात्रे यांच्या हस्ते झाले. तर सेक्टर १९ भाजप पक्ष कार्यालय येथे विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष रावल, अनामिका नायक, प्रिया अडसुले यांच्या हस्ते झाले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त बामणडोंगरी गाव जिल्हा परीषद शाळेतील विद्यार्थ्यांना एकूण ६३ हजार रुपये बक्षीस म्हणून देण्याचा मान वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांना मिळाला. पुढील वर्षी क्रीडा कलामध्ये अव्वल क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षण क्षेत्रात नंबर मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना असे एकूण एक लाख १० हजार बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. या वेळी चेअरमन सुहास जाना म्हात्रे, व स्कूल कमिटी अमर केसरीनाथ म्हात्रे (उपसरपंच, विभागीय अध्यक्ष, उलवे नोड भाजप) उपस्थित होते.







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभक्तीपर वातावरणात ७५वा प्रजासत्ताक दिन पनवेलमध्ये साजरा झाला. पनवेल तालुका क्रीडा संकुलात प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन करून राष्ट्रध्वाजाला सलामी देण्यात आली.

या वेळी आनंदी नाथा कोंडीलकर यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेच्या दोन लाख रुपयांचा तर २०२२–२३ सालच्या पीक स्पर्धेत विजयी झालेल्या शेतकऱ्याला पाच हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

क्रीडा सुंकलात झालेल्या या ध्वारोहणाच्या कार्यक्रमावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, प्रांत अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह अधिकारी, नागरिक आणि मान्यवर उपस्थित होते.



पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त शेलघर मराठी शाळा येथे श्रीधर भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, रतन भगत, उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, अमृत भगत, सुहास भगत, रमेश घरत, अजय भगत, प्रल्हाद भगत, अशोक भगत, अनुप भगत, सुनील भगत, जीवन भगत, योगेश भगत, नितीन भगत, शिक्षक अशोक पाटील, अनिल थोरवे, वासंती भगत, बानू बाई भगत आणि ग्रामस्थ आदी उपस्थित होते.



पनवेल : दिघाटी येथील जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त सरपंच रजनी हिरामण ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी शाळा कमिटी अध्यक्ष, उपसरपंच, सदस्य ग्रामसेविका, शिक्षक पालक आदी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाच्या तर्फे ७५वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




७५वा प्रजासत्ताक दिनानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सदस्य मा.अनिल भगत साहेब उपस्थित राहिले होते व त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. महाविद्यालयातील नॅशनल कॅडेटस् कौरच्या (एनसीसी) कॅडेटसनी व सर्व उपस्थितांतर्फे ध्वजाला सलामी देण्यात आली. या वेळी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे यांनी उपस्थितांना भारतीय संविधानाचे लोकशाहीतील महत्त्व व उद्देशिकाची व्यापकता व अन्य वेगवेगळ्या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्याच वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका सर्व उपस्थितांसमोर वाचून दाखवली.

महाविद्यालयातील नॅशनल कॅडेटस् कौरच्या (एनसीसी) कॅडेटसनी भारतीय ध्वजाला सलामी देऊन संचलन केले व काही देशभक्तीपर प्रात्याक्षिके सादर केली. तसेच महाविद्यालयाच्या (एनसीसी) कॅडेटसनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल त्यांचे व त्यांच्या पालकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या दरम्यान दृष्टी फाउंडेशन तर्फे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुखांना भारतीय संविधानाची उद्देशिका वितरीत करण्यात आली. या शैक्षणिक वर्षातील नॅशनल कॅडेटस् कौरचा (एनसीसी) गुणवंत विद्यार्थी एस.यु.ओ. हृदय पवार याचा टी.एस. सी. कॅम्प २०२३, नवी दिल्ली या ठिकाणी उपस्थित राहिल्याबद्दल रोट्रॅक्ट क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या तर्फे ५,००० ची स्कॉलरशिप देऊन गुणगौरव करण्यात आला. या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरातील व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी उपस्थित राहून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे, लेफ्टनंट प्रा. निलिमा तिदार, सी. टी. ओ. डॉ. जे. एम. पावरा आणि कॅडेटस् यांनी अथक परिश्रम केले.

७५वा प्रजासत्ताक दिन झाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान



**प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकाऱ्यांकडून ध्वजारोहण**

*जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार, स्नेहा उबाळे, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पोलीस मुख्यालयाच्या मैदानात भारताच्या ७५व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा मंत्री तटकरे व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला..

पुरस्कार्थींची नावे पुढीलप्रमाणे :- गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार अभय शंकर घरत, अलिबाग (राष्ट्रीय केमिकल्स अँण्ड फर्टिलायझर्स लि.थळ), संदीप गजानन पिसाळ, आरसीएफकॉलनी (राष्ट्रीय केमिकल्स अँण्ड फर्टिलायझर्स लि. थळ), उमेश वामन जाधव, सुधागड (विभा हॉस्पिलिटी सर्व्हिस आशापुरा धाम वाशी सानपाडा, नवी मुंबई).

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या सोनाली राजेंद्र तेटगुरे, ढालघर, ता. माणगाव; अक्षता अशोक अडागळे, ता. म्हसळा यांना गौरविण्यात आले.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमाचे जिल्हास्तरीय विजेते (पुरस्काराचे स्वरुप रोख एक लाखांचा धनादेश व प्रशस्तीपत्र) मोहम्मद अनास रफिक मेमन, खान मोहम्मद अकदूस खलिद, कांबळे सत्विक संतोष.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांमध्ये उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या रुग्णालयांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

शिक्षण विभाग (माध्यमिक), रायगड जिल्हा परिषद:- परमेश्वरी प्रशांत वेदक, गो.म.वेदक विद्यामंदिर तळा (ऑनलाईन जर्मन लँग्वेज एक्झाममध्ये देशात पहिली), मोनिका संदीप बाबर, जानकीबाई रघुनाथ हळदवणेकर कन्याशाळा अलिबाग (५०वे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी), परी संदेश काटकर, आरसीएफ सेंकडरी अँण्ड ज्युनिअर कॉलेज कुरुळ, अलिबाग (५०वे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी), स्वरा अविनाश पाटील, चिंतामण केळकर विद्यालय,अलिबाग (५०वे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी), अवधुत संदीप वारगे, आरसीएफ सेंकडरी अँण्ड ज्युनिअर कॉलेज कुरुळ, अलिबाग, (५०वे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन क्रीडा प्रबोधिनी बालेवाडी)

गरोदर मातांना बेबी केअर किट वाटप :- योगिता अशोक पाटील. अंगणवाडी सेविकांना मोबाईल वाटप- वैजयंती विशाल पाटील, विजयश्री विलास पाटील, दिप्ती जितेंद्र पाटील, सुकेशिनी दांडेकर, वैष्णवी मुकादम.


# पाली भूतिवली धरणाचे पाणी शेतीसाठी द्यावे

## शेतकऱ्यांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेपट्ट्यातील जमीन ओलिताखाली आणून परिसर हिरवागार करण्यासाठी पाटबंधारे विभागाने पाली भूतिवली लघुपाटबंधारे प्रकल्प साकारला आहे. या धरणाच्या जलाशयात साठून असलेले पाणी शेतीसाठी पुरविण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.

कर्जतच्या रेल्वेपट्ट्यात कोणतीही नदी नसल्याने या भागात सतत पाणीटंचाई असायची. त्यामुळे १९८२ साली पाली भूतिवली येथे लघुपाटबंधारे प्रकल्प मंजूर झाला, मात्र या धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम १९९६मध्ये सुरू झाले. त्या वेळी तत्कालीन आमदार देवेंद्र साटम यांनी पुढाकार घेत कामाला सुरुवात करून घेतली होती. परिसरातील पंधरा गावांमधील एक हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आणू शकणाऱ्या या धरणात २००४मध्ये प्रत्यक्ष पाणीसाठा झाला आणि त्या वेळी तत्कालीन आमदार सुरेश लाड यांच्या उपस्थितीत जलपूजन करण्यात आले होते, मात्र धरणाच्या जलाशयात पाण्याचा साठा झाला असताना पाणी शेतीसाठी सोडण्यासाठी कालवे बांधण्यात आले नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांना दुबार शेती करता आली नाही. आता कालव्यांची कामे पूर्ण करून शेतीसाठी या धरणाचे पाणी सोडण्यात यावे याकरिता शेतकरी एकवटत आहेत.



**पाटबंधारे विभागाकडून काम सुरू**

मागील दोन वर्षे शेतकरी या धरणाच्या अर्धवट असलेल्या कालव्यांच्या कामासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे अर्ज, निवेदने घेऊन जात होती. आमदार थोरवे यांनीही शासनाकडे कालव्यांची व धरणाची इतर कामे पूर्ण करण्यासाठी तब्बल १५७ कोटींचा निधी वळविला असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या धरणाच्या सांडव्याचे भिंतीचे तसेच मुख्य बांधाचे दगडी पिचिंगचे काम पाटबंधारे विभागाने सुरू केले आहे.

**आमच्या भागातील शेतकऱ्यांना जमिनीत दुबार पीक घ्यायचे आहे. त्यासाठी आम्ही शेतकरी एकत्र येत आहोत. जे स्वप्न आधीच्या शेतकऱ्यांनी बघितले होते ते पूर्ण करण्यासाठी तरुणांनी आता एकत्र येऊन पाठपुरावा सुरू केला आहे.**
**-सचिन गायकवाड, शेतकरी**

# सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यास मजरे जांभुळपाडा ग्रामसभेची मंजुरी

## जंगलांचे शाश्वत नियोजन आवश्यक -प्रांताधिकारी

**पाली : प्रतिनिधी**

वनविभाग अलिबाग, प्रांत कार्यालय रोहा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण आणि सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, मजरे जांभूळपाडा यांच्या समन्वयाने सुधागड तालुक्यातील मजरे जांभुळपाडा या गावाचा पहिला सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडा मंजूर करण्यात आला आहे. चिवे येथे ही ग्रामसभा झाली.

या वेळी मार्गदर्शन करताना जंगलांचे शाश्वत नियोजन लोकांना शत्रू मानून करता येणार नाही, तर स्थानिक लोक समुदायाच्या सक्रिय सहभागातून करता येणे शक्य आहे, असे मत प्रांताधिकारी तथा उपविभागस्तरीय वनहक्क समिती सुधागडचे अध्यक्ष अरुण उंडे यांनी व्यक्त केले; तर जंगलांचे शाश्वत नियोजन करण्याची खरी क्षमता आदिवासी लोक समुदायाच्या ठायी आहे, तयार केलेला आराखडा केवळ कागदावर न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी आमच्या अधिकार क्षेत्रात असणारी सर्वतोपरी मदत करण्यास आम्ही तयार आहोत, असे रोहा नायब तहसीलदार अमृता सुतार यांनी सांगितले.

संपूर्ण रायगड जिल्ह्यात वन संवर्धनाचा नवा अध्याय स्थानिक आदिम लोकसमुदायांच्या व उप वनसंरक्षक कार्यालय, अलिबाग, प्रांत कार्यालय, रोहा, वन विभाग, सुधागड यांच्या सामूहिक सक्रिय सहभागातून सुरू झाला आहे, असे कॅम्पेन आणि प्रोग्राम्स, वातावरण फाऊंडेशनचे लिड राहुल सावंत म्हणाले.



पर्यावरणाची पडझड होत असणाऱ्या काळात मजरे जांभुळपाडा या गावच्या सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीने वन व्यवस्थापनाचा सूक्ष्म आराखडा तयार करून वन संवर्धनाच्या दिशेने टाकलेले पाऊल महत्त्वाचे आहे. स्थानिक आदिम आदिवासी व इतर लोकसमुदाय एकत्रित या मोहिमेत उतरला ही वाखाणण्याजोगी बाब आहे.

जंगलांच्या शास्त्रीय व्यवस्थापनाकरिता वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली जंगलात शिवार फेरी करून सुक्ष्म नियोजन दर्शविणारा रिसोर्स मॅप तयार केला ही कृती संपूर्ण रायगड जिल्ह्यात पहिल्यांदाच आमच्या ग्रुप ग्रामपंचायत चिवे हद्दीतील सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती मजरे जांभुळपाडाने केली. एवढेच नव्हे तर वनांचे शाश्वत नियोजन करून त्याचा आराखडाही आज या समितीने विशेष ग्रामसभेसमोर सादर केला आहे. या आराखड्याला ग्रामसभेत एकमताने मंजुरी दिली आहे. याचाच अर्थ वनांच्या रक्षणासाठी आमच्या ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिक तयार आहेत. हा आदर्श इतरांनीही घ्यावा, असे आवाहन सरपंच रोहिदास साजेकर यांनी केले.

आदिवासी नागरिकांनी एकत्र येऊन हे उत्तम काम केले आहे. त्यामुळे लोकांच्यात जाणीव जागृती होण्यास सुरुवात झाली आहे. त्याची प्रचिती आजच्या ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या नागरिकांच्या संख्येवरून येत आहे, असे उपसरपंच अरविंद ठाकूर म्हणाले.

या विशेष ग्रामसभेस नायब तहसीलदार प्रज्ञा राजमाने, ग्रामपंचायत सदस्य अमोल वारुळे, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, पेणचे आव्हाड, कृषी विभाग विस्तार अधिकारी संकेत गायकवाड, वनरक्षक चिवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

**सातत्यपूर्वक परिश्रम घेऊन मजरे जांभूळपाडा गावचा सूक्ष्म आराखडा त्यांनी तयार केला आहे. आता याची अंमलबजावणी करण्यासाठी हा आराखडा लवकरात लवकर प्रशासनाने मंजूर करावा व या आदिम आदिवासी लोक समुद्यांना स्थानिक जागेवर निसर्गकेंद्री रोजगार उपलब्ध करून द्यावा.**
**-राहुल सावंत, लिड, कॅम्पेन आणि प्रोग्राम्स, वातावरण फाऊंडेशन**

**कमी होत असलेल्या जंगलाचे प्रमाण वाढवण्याचा आम्ही एकजुटीने पुरेपूर प्रयत्न करणार आहोत. त्यासाठी वन संवर्धन व व्यवस्थापनाची मोहीम वातावरण फाऊंडेशनच्या सहकार्याने आम्ही हाती घेतली आहे.**
**-सुभाष जाधव, सचिव, सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती**

# स्वामित्व योजनेंतर्गत गावांची सनद वाटप

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारतीय ७५व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी स्वामित्व योजनेंतर्गत गावठाण सर्वे झालेल्या अलिबाग तालुक्यातील मौजे-परहुरपाडा, भाकरवड, मान तर्फे झिराड, खंडाळे, लोणारे व नारंगी या गावांची सनद वाटप करण्यात आली.

## *दोन लाख ८६ हजार ५५० रुपये सनद वसूल*

उपअधीक्षक भूमी अभिलेख, अलिबाग भोलाशंकर कोकने व शिरस्तेदार बाळासाहेब दुरगुडे यांनी विशेष लक्ष देऊन एकूण रक्कम दोन लाख ८६ हजार ५५० रुपये सनद वसूल केली आहे.

# कलगीतुरा सांस्कृतिक समन्वय समितीची सभा उत्साहात

## विस्तारित कार्यकारिणी जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

कलगीतुरा सांस्कृतिक समन्वय समिती रायगड-रत्नागिरी यांची कार्यकारिणी सभा नुकतीच माणगाव येथील कुणबी भवनात उत्साहात झाली. या सभेचे अध्यक्षपद समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश महाबळे यांनी भूषविले.

प्रथम उपस्थित पदाधिकारी, शाहीर, कलाकार मंडळी यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर समन्वय समितीची ध्येय धोरणे निश्चित करण्याचा दृष्टीने विचार मांडण्यात आले. त्यावर सखोल व कला, शाहीर हितकारक वैचारिक चर्चा करून धोरण निश्चिती करण्यात आली. त्या अनुषंगाने रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील लोककला मंडळे यांच्याशी समन्वय समितीची भूमिका, विचार ठेवण्याचा निर्णय करण्यात आला.

सध्यस्थितीत दोन्ही जिल्ह्यांतील नऊ तालुक्यांतील विविध मंडळे समन्वय समितीला जोडण्यात आली आहेत. ध्येय धोरणाची अंमलबजावणी करून या सांस्कृतिक मंडळातील शाहीर, कलावंत यांच्या उन्नतीबाबत विचारविनिमय करण्यात आला. शासन दरबारी कलावंताला त्यांचा न्यायिक हक्क मिळावा यासाठी समिती कृतिशील पावले उचलणार आहे. भविष्यात ही लोककला तशीच रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारी रहावी यासाठी यामध्ये



कालानुरूप बदल करण्याचा विचार मांडण्यात आला असून त्यावर या लोककलेतील प्रतिभावंत, अभ्यासक, समीक्षक व रसिक यांच्या विचाराने जाखडी व तमाशा यांचे सादरीकरण यापुढे कसे असावे यावर चर्चात्मक संवाद करण्यात आला.

सभेला रामभाऊ टेंबे, श्री.बक्कम, कृष्णा शिंदे, सचिन माळी, सहदेव उत्तेकर, शंकर तुर्डे, हरिदास शिंदे, बाळा महाबळे, शिवाजी वालंज, मालू पाटेकर, अर्जुन कळमकर, महादेव तेलेंगे, रामचंद्र म्हात्रे, नथुराम पाष्टे, दीपक भोस्तेकर, हरी वेजरीम, रमेश शिर्के, राजाराम जाधव, नारायण पडवळ, एकनाथ मांढरे, केशव बटावले, गोविंद शिंदे, सुनील शिगवण, श्रीराम भोईर, संतोष भात्रे, बाळा पाष्टे व शाहीर, कलावंत उपस्थित होते.

या सभेत कलगीतुरा सांस्कृतिक समन्वय समिती रायगड रत्नागिरी कार्यकारिणी विस्तारित करण्यात आली. यामध्ये संस्थापक रामभाऊ टेंबे (माणगाव), अध्यक्ष सुरेश महाबळे (कोलाड), उपाध्यक्ष कृष्णा शिंदे (महाड), रामचंद्र म्हात्रे (म्हसळा), सचिव सचिन माळी (मंडणगड), सहसचिव सहदेव उत्तेकर (महाड), सदस्य श्रीधर वाळंज (कोलाड), शंकर फणसे (महाड), रामदास वारीक (माणगाव), किसन बाटे (महाड), शंकर तुर्डे (पोलादपूर), वसंत भोईर (रोहा), विद्यानंद अधिकारी (माणगाव), अजित लाड (मंडणगड), परशुराम खानविलकर (निजामपूर), वामन बैकर (गोरेगाव), अरुण नाक्ती (मंडणगड), पवन महाडिक (तळा), रमेश शिर्के (माणगाव), नथुराम पाष्टे (माणगाव) यांचा समावेश आहे.

# हिरवळ महाविद्यालयात ऊर्जा संवर्धन दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाडमध्ये ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त महाविद्यालयातील नेचर क्लब व विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून महाविद्यालयाच्या प्रा. प्रिया कदम आणि प्रा. माधुरी कांबळे तसेच प्राचार्य सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य कदम यांनी पर्यावरणीय शाश्वततेसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांची व त्यांना विज्ञानाच्या योगदानाची आवश्यकता आहे, असे मत व्यक्त केले.



प्रा.प्रिया कदम यांनी सद्यस्थितीत ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व सांगितले. हिरव्यागार आणि पर्यावरणपूरक भविष्याची हमी देण्यासाठी शाश्वत पद्धतींचा अवलंब करणे का आवश्यक आहे यावर त्यांनी विवेचन केले. शाश्वत ऊर्जा उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समूह जबाबदारीचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

प्रा.माधुरी कांबळे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यापासून मूलभूत दैनंदिन दिनचर्या स्वीकारण्यापर्यंत समाजाने ऊर्जा वापर कमी करण्यासाठी वापरता येण्याजोग्या धोरणांबद्दल सल्ला दिला. त्यांनी उपस्थित असलेल्या प्रत्येकाला ऊर्जा-बचत तंत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि कुटुंब, मित्र, परिवार, समाज यांच्यासमवेत ऊर्जा संवर्धनाबाबत जागरूकता पसरविण्याचे आव्हान केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी महाविद्यालयाच्या आत आणि बाहेर ऊर्जा संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी नवनवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत महाविद्यालयाला आवाहन केले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनी कायद्याचे पालन करणारे नागरिक विकसित करण्यासाठी शिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला आणि शाश्वत संस्कृतीला चालना देण्यासाठी महाविद्यालयाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकला. या उपक्रमांमुळे समाजावर काय फायदेशीर परिणाम होऊ शकतात याबद्दल त्यांनी आशावाद व्यक्त केला.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी ऊर्जा संवर्धन दिन कार्यक्रमासारख्या मोहिमांच्या महत्त्वाविषयी चर्चा केली आणि ऊर्जा-कार्यक्षम जीवन जगण्यास प्रोत्साहन दिले.

# पर्ण फाउंडेशनतर्फे अपघाती कुटुंबाला अर्थसहाय्य, विद्यार्थिनींना सायकलचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

पर्ण फाउंडेशनमार्फत महाडचे स्व. अण्णासाहेब सावंत यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एका अपघाती जखमी कुटुंबाला अर्थसहाय्य देण्यात आले तसेच दुर्गम भागातील गरीब व गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

स्व. अण्णासाहेब सावंत यांच्या पत्नी तथा पर्ण फाउंडेशनच्या अध्यक्ष शोभा सावंत यांच्या महाड येथील यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमास त्यांच्यासह सेक्रेटरी शिवराज सावंत, डॉ. प्रभाकर जाधव, अ‍ॅड.हेमंत चांदलेकर यांची विशेष उपस्थिती होती.



महाड तालुक्यातील पारवाडी येथील प्रीती प्रकाश आमले, प्रज्ञा प्रकाश आमले व रूपेश प्रकाश आमले घरगुती गॅस दुर्घटनेत जखमी झाले होते. अर्बन बँकेच्या कर्मचारी सायली शैलेश म्हस्के यांनी या कुटुंबासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल सावंत यांनी घेतली आणि या कुटुंबाला २५ हजार रुपयांची आर्थिक मदत फाउंडेशनच्या माध्यमातून देण्यात आली तसेच तालुक्यातील लाडवली येथील सृष्टी अल्पेश शितोळे व आर्चिता विलास पवार या दोन गरीब व गरजू शालेय विद्यार्थिनींना शाळेमध्ये जाण्यासाठी सायकलींचे मोफत वाटप करण्यात आले. या मोलाच्या मदतीबद्दल पर्ण फाउंडेशनचे मनस्वी आभार मानण्यात आले.

# आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले खेळाडूंना प्रोत्साहित



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष भाताण आणि भाताणपाडा यांच्या वतीने आमदार चषक २०२४ या क्रिकेट स्पर्धेला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. ही स्पर्धा २९ जानेवारीपर्यंत भाताण येथील गोवर्धन मैदानात रंगणार आहे.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम, सरपंच तानाजी पाटील, अरुण पाटील, दीपक ठाकूर, अनिल काठावले, दीपक दुर्गे, स्वप्नील भोईर, किरण मुकादम, बाळाराम भोईर, अनिल भोईर, समीर भोईर, गुरूनाथ खारके, अरुण म्हसकर, एकनाथ ठाकूर, मधुकर मुकादम, दत्तात्रेय ठाकूर, राम ठाकूर, भरत ठाकूर, शांताराम पाटील, हरिश्चंद्र ठाकूर, गौरू ठाकूर, विकास जुमारे, भगवान ठाकूर, सुभाष पाटील, राम पाटील, प्रिया मुकादम, दीपक ठाकूर, अशोक भोईर यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

या क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या संघास एक लाख रुपये, द्वितीय क्रमांक ५० हजार, तृतीय ३० हजार आणि चौथ्या क्रमांकाला २५ हजार आणि सर्व विजेत्या संघांना भव्य चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

# जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उरणच्या विद्यार्थ्यांचे यश

**उरण : बातमीदार**



रायगड जिल्हा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा नुकतीच रसायनी एचओसी कॉलेज येथे झाली. या स्पर्धेत सेंटमेरी स्कूल व एकलव्य ॲथलेटिक्स अकॅडमी जेएनपीटी-उरणच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत यश संपादन केले. त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

स्पर्धेत ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास रायगड जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव प्रवीण खुटारकर, दिलीप पाटील, यतिराज पाटील आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत गोळाफेक क्रीडा प्रकारात १० वर्षाखालील मुलांमध्ये अनंत राम चौहान याने प्रथम, १२ वर्षाखालील गटात अर्णव निलेश घरत याने प्रथम, मुलींमध्ये साधना सर्वानंद हिने तिसरा क्रमांक पटकाविला. हेमांशु रवींद्र पाटीलने १०० मीटर व ६० मीटर धावण्याच्या शर्यतीत तृतीय, मायरा महेश पाटीलने थ्रो बॉल क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व विद्यार्थ्यांची सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सेंटमेरी जेएनपीटी स्कूलचे मुख्याध्यापक राजेश अलफॉन्स, सुपरवायझर ज्योती नायडू यांच्यातर्फे सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना स्कूलचे क्रीडा शिक्षक राष्ट्रीय खेळाडू राम चौहान, योग शिक्षिका पूनम चौहान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# एमपीएएससी कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव



पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव २०२३-२४चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. २७) झाले.

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास जिमखाना प्रमुख डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि रायगड टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, एन. बी. पवार, वाजीदा सिद्धवटम, समन्वय समिती सदस्य बोरगावे, विद्यार्थी परिषदेच्या सचिव नेहा म्हात्रे, आभार विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष हर्षदा मोकल, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रवीण गायकर यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

या वेळी परेश ठाकूर यांनी खेळाचे आपल्या आरोग्यासंदर्भात महत्त्व सांगून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# शिरवलीवाडी संघ आदिवासी चषकाचा मानकरी

**खालापूर : प्रतिनिधी**





भारतीय जनता पक्ष खालापूर शहराच्या वतीने नगरपंचायत हद्दीतील आदिवासी बांधवांसाठी शहर कार्यकारिणी व किशोर म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आदिवासी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शिरवलीवाडी संघाने विजेतेपद पटकाविले.

प्रजासत्ताक दिनी ही स्पर्धा खालापूर शहरात विनाशुल्क घेण्यात आली तसेच सर्व खेळाडूंना क्रिकेट जर्सी व जेवणाची सोय करण्यात आली होती. एकूण आठ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे कर्जत खालापूर विधानसभा प्रमुख किरण ठाकरे यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण समारंभ माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते करण्यात आला.

या स्पर्धेस भाजप तालुका उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, सनी यादव, आध्यात्मिक आघाडी जिल्हा संयोजक काशिनाथ पार्टे, युवा मोर्चा विधानसभा संयोजक प्रसाद पाटील, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष सुजाता दळवी, श्वेता मनवे, माजी सरपंच अनिल चाळके, बूथ अध्यक्ष ज्ञानेश्वर पारंगे, जयेंद्र पाटील, सचिन ओसवाल, पुंडलिक लोते आदी उपस्थित होते.

स्पर्धेत वणवेवाडी संघ उपविजेता ठरला. मालिकावीर अनिल पवार (शिरवलीवाडी), उत्कृष्ट फलंदाज रोहित पवार (वणवेवाडी), तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून संदेश वाघमारे (वणवेवाडी) यांना गौरविण्यात आले.

या स्पर्धेत कारसेवक दिनेश फराट यांचा प्रभू श्रीरामाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी भाजप नेते किशोर म्हात्रे, खालापूर शहर अध्यक्ष दीपक जगताप, उपाध्यक्ष अमीर पार्टे, चिटणीस गणेश पारंगे, रोहिदास पाटील, युवा मोर्चा शहर सरचिटणीस शीतल वाघरे, बूथ अध्यक्ष लक्ष्मण जाधव, प्रवीण पाटील, जिग्नेश भानुशाली, दत्तात्रय चाळके, हनुमंत पार्टे, सूरज पार्टे आदींनी मेहनत घेतली.






**कामोठे : स्व. मितेश जोशी यांच्या स्मरणार्थ रविशेठ जोशी सन्मान चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रविशेठ जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, काका कुत्तरवडे यांच्यासह इतर मान्यवर आणि खेळाडू उपस्थित होते.**

# गाईल्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेत धैर्य पाटीलची चमक






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित गाईल्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेत चेंबूर येथील मॉर्डन इंग्लिश स्कूलने बाजी मारली आहे. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मॉर्डन इंग्लिश स्कूलकडून खेळणारा उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा क्रिकेटपटू धैर्य किशोर पाटील याने चमकदार कामगिरी केली.

अंतिम सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झाला. या सामन्यात पनवेल तालुक्यातील कोपर येथील मूळचा रहिवासी असलेल्या धैर्य पाटीलने निर्यायक भूमिका बजावत ८१ धावा केल्या. यामध्ये दोन षटकार आणि आठ चौकारांचा समावेश होता. या खेळीबद्दल त्याला पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आला.

धैर्य हा रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे प्रशिक्षक संतोष मटकर आणि मॉर्डन इंग्लिश स्कूलमधील अचिव्हर क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक सुब्बू व विक्की यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. महत्त्वाच्या गाईल्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेत केलेल्या चमकदार कामगिरीमुळे धैर्य पाटीलवर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे एक धाव आरोग्यासाठी!



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील बॉम्बे डाईंग कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर रजनीश दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा येथील वसाहतीतील नागरिकांनी आरोग्य सुदृढ राहावे यासाठी शनिवारी (दि.२७) आयोजित मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेला प्रतिसाद लाभला.

कंपनीच्या वेस्ट कॉलनीमध्ये मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. मॅरेथॉन सुरू होण्यापूर्वी आरोग्य प्रशिक्षक गणेश राठोड यांनी स्ट्रेकिंगविषयक विविध प्रात्यक्षिके करून दाखविली. आयोजक सोमेश्वर काळे यांनी आरोग्यासाठी स्ट्रेकिंग किती महत्त्वाचे आहे हे विषद केले.

### मॅरेथॉनला प्रतिसाद



मॅरेथॉनचे उद्घाटन माजी सरपंच संदीप मुंढे यांच्या हस्ते झाले. या वेळी कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट भिबू प्रसाद मिश्रा आणि आयोजक सोमेश्वर काळे यांनी स्वागत केले.

या वेळी बॉम्बे डाईंग वसाहतीतील एक धाव आरोग्यासाठी म्हणून लहानांपासून मोठ्यांपर्यंत नागरिक रस्त्यावर धावले. यानंतर कंपनीच्या वेस्ट कॉलनीत क्रिकेट स्पर्धा रंगली.

# पोपच्या शतकाने इंग्लंडचे पुनरागमन

## १२६ धावांची आघाडी

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

पहिल्या कसोटीत इंग्लंडने जोरदार पुनरागमन करीत भारताविरुद्ध १२६ धावांची आघाडी घेतली आहे. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लिश संघाने दुसऱ्या डावात सहा गडी गमावून ३१६ धावा केल्या होत्या. उपकर्णधार ऑली पोपने जबरदस्त खेळी करीत शतक झळकावले आणि तो नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतला. तो २०८ चेंडूंचा सामना करताना १४८ धावांवर नाबाद आहे.

पोपने २०८ चेंडूंत १७ चौकारांच्या मदतीने नाबाद १४८ धावा केल्या. यादरम्यान रेहान अहमदने त्याला साथ दिली आणि ३१ चेंडूंत दोन चौकारांच्या मदतीने नाबाद १६ धावा केल्या. पोपचे शतक इंग्लंडसाठी संजीवनी ठरले. त्याच्या शतकापूर्वी इंग्लंडचा संघ जवळपास सामन्यातून बाहेर पडला होता, मात्र आता त्यांनी पुन्हा एकदा दमदार पुनरागमन केले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com